# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक २६० वा शुक्रवार दि.११ एप्रिल २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.







## 'राहुल गांधींनी १ वर्ष तरी संघाच्या शाखेत जावे, म्हणजे त्यांना', भाजप नेत्याने सांगितला संघात जाण्याचा फायदा

गुजरातमधील अहमदाबाद येथे काँग्रेसचे ८४ वे अधिवेशन पार पडले. या अधिवेशनात बोलताना लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ वर जोरदार टीका केली. त्यांनी संघाच्या मुखपत्र 'ऑर्गनायझर'चा हवाला देत ख्रिश्चन समुदायावर हल्ल्यांची तयारी सुरू असल्याचा आरोप केला होता.

राहुल गांधींनी वक्फ विधेयकावरून भाजप आणि आरएसएसवर जोरदार टीका केली होती. यावर आता उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री आणि भाजप नेते केशव प्रसाद मौर्य प्रत्युत्तर दिले आहे. राहुल गांधींनी संघाच्या शाखेत जावे. म्हणजे त्यांना संघ काय काम करतो हे कळेल, असे प्रत्युत्तर मौर्य यांनी दिले.

राहुल गांधींवर निशाणा साधत केशव प्रसाद मौर्य म्हणाले की, राहुल गांधी यांनी किमान एक वर्ष तरी ठङड च्या शाखेत घालवावे. म्हणजे त्यांना संघ म्हणजे काय हे समजेल. आरएसएसमध्ये राष्ट्रवाद, समाजसेवा आणि मूल्याधिष्ठित जीवनशैलीचे शिक्षण दिले जाते. राहुल गांधी यांनी अशा प्रकारची दिशाभूल करणारी वक्तव्यं टाळायला हवीत.



काय म्हणाले होते राहुल गांधी?

काँग्रेसच्या अधिवेशनात बोलताना राहुल गांधींनी वक्फ विधेयकावरून भाजप आणि आरएसएसवर निशाणा साधला होता. ते म्हणाले की, भाजपने लोकसभेत वक्फ दुरुस्ती विधेयक मंजूर केले. हा धार्मिक स्वातंत्र्य आणि संविधानावर हल्ला आहे. आरएसएसच्या मुखपत्र ऑर्गनायझरमध्ये लिहिले आहे की ख्रिश्चनांवर हल्ला होणार आहे. हे धर्मविरोधी विधेयक आहे. देशातील प्रत्येक व्यक्तीला हे माहित असले पाहिजे. बांगलादेश भाराताविरुद्ध विधाने करत आहे. भारताचे पंतप्रधान तिथे त्या नेत्यांना भेटले. त्यांच्या तोंडातून एकही शब्द बाहेर पडला नाही, अशी टीका त्यांनी केली होती.

आम्ही ब्रिटिशांविरुद्ध आणि आरएसएसच्या विचारसरणीविरुद्ध लढलो. त्यांची विचारसरणी स्वातंत्र्यलढ्याची विचारसरणी नाही. ज्या दिवशी संविधान लिहिण्यात आले, त्याच दिवशी रामलीला मैदानात संघाने संविधान जाळले होते. वर्षानुवर्षे, आ रएसएसने तिरंग्याला सलाम केलेला नाही, अशी जोरदार टीका त्यांनी संघावर केली.

## आता कर्जमाफीसाठी मशाल आंदोलन करणार; बच्चू कडूंनी केले जाहीर

नाशिक : शेतक-यांच्या कर्जमाफीच्या मागणीसाठी बच्चू कडू पुन्हा सरकारविरोधात आक्रमक झाले आहेत. कर्जमाफीसाठी ते आता मशाल आंदोलन करणार आहेत. त्यांच्या या आंदोलनाची राज्यभरात चर्चा आहे.



कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या नाशिकमधील निवासस्थानासमोर उद्या रात्री (११ एप्रिल) मशाल पेटवून बच्चू कडू आंदोलन करणार आहेत. दुसरीकडे राज्यभरातील प्रहारचे कार्यकर्ते सत्ताधारी आमदारांच्या घरासमोर मशाल पेटवून आंदोलन करणार आहेत. सरकारने निवडणुकीमध्ये शेतक-यांना कर्जमाफीचे आश्वासन दिले होते, परंतु शेतक-यांची कर्जमाफी केली नाही त्यामुळे बच्चू कडू आक्रमक झाले आहेत. शेतक-यांचा सातबारा कोरा करा अशी मागणी बच्चू कडू यांनी केली आहे.

ज्या सरकारच्या धोरणामुळे आमच्या शेतक-यांच्या घरातील दिवे विझायला लागले त्या विरोधात आम्ही आंदोलन करू, असे कडू म्हणाले. शेतक-यांचे पालकत्व ज्यांच्याकडे आहे ते कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या घरासमोर मशाल पेटवून आंदोलन करणार आहे. हातात मशाल, गळ्यात निळा दुपट्टा आणि भगवा झेंडा घेऊन आम्ही आंदोलन करू असे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, शेतक-यांच्या कर्जमाफीच्या मागणीसाठी बच्चू कडू पुन्हा सरकारविरोधात आक्रमक झाले आहेत. कर्जमाफीसाठी ते आता मशाल आंदोलन करणार आहेत. महायुतीत ते गेल्यावेळी मंत्री होते. पण विधानसभा निवडणुकीत त्यांनी वेगळा घरोबा केला. विधानसभेत त्यांना आमदारकी टिकवता आली नाही. तरीही प्रहार संघटनेच्या माध्यमातून ते अनेकदा भूमिका घेताना दिसतात. सध्या त्यांनी कर्जमाफीसाठी एल्गार पुकारला आहे. त्यांच्या या आंदोलनाची राज्यभरात चर्चा आहे.

## राजर्षी शाहू विद्या मंदिर शाळेत बक्षीस वितरण व निरोप समारंभाचा कार्यक्रम संपन्न.

केज/प्रतिनिधी अशी पाखरे येती आणिक स्मृती ठेवूनी जाती.केज शहरातील स्वामी दयानंद प्रतिष्ठान केज संचलित राजर्षी शाहू विद्या मंदिर प्राथमिक शाळेत इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला तसेच सांस्कृतिक कार्यक्रमातील सहभाग व विविध स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांचे बक्षीस वितरण करण्यात आले.निरोप समारंभाचे आयोजन इयत्ता सहावीतील विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापिका चाटे बी.बी.यांच्या नियोजनानुसार शिक्षकांच्या मदतीने केले होते.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती चाटे बी.बी. तर प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी दयानंद प्रतिष्ठान केजचे सहसचिव तथा शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री.अशोकराव डांगे तर प्रमुख उपस्थितीमध्ये शाळेतील ज्येष्ठ शिक्षक श्री.यादव व्ही. बी.यांची उपस्थिती होती.



प्रारंभी छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार घालण्यात आला.वार्षिक स्नेह संमेलनामध्ये सहभागी सर्व विद्यार्थ्यांना तसेच शाळेतील विविध स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना यावेळी बक्षीसाचे वितरण करण्यात आले. कार्यक्रम प्रसंगी सातवीच्या अनेक विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त करताना शाळेत आलेले अनुभव खूप आत्मीयतेने सांगितले व शाळेतील शिक्षकांचे ऋण व्यक्त केले.त्यांनी दिलेली शिक्षणाची ही प्राथमिक शिदोरी आमच्या उर्वरित आयुष्याचा भक्कम पाया असल्याचे याप्रसंगी नमूद केले.यावेळी कु. अनुजा तिडके,कु. ज्ञानेश्वरी खाडे व कु. गार्गी क्षीरसागर यांनी आपले शाळेतील अनुभव सांगितले व आठवणींना उजाळा दिला. विद्यार्थ्यांना बोलताना श्री. यादव म्हणाले म्हणाले चांगली व्यक्ती म्हणून जीवन जीवन जगा,आपले ध्येय निश्चित करा.जे क्षेत्र निवडाल त्यात निपुण व्हा.श्रीमती अनिता जाधव यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांना आपले ध्येय निश्चित करून ते मिळवण्यासाठी प्रयत्नरत राहा असे सांगत भावी आयुष्यासाठी मनभरुन शुभेच्छा दिल्या.प्रमुख पाहुणे श्री. डांगे यांनी यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन करत त्यांचे कौतुक केले व जीवनातील प्रत्येक संकटाचा सामना धैर्याने करा व आपल्या यशस्वी जीवनातून शाळा पालक व देशासाठी अभिमानास्पद कामगिरी करा असे सांगितले.परिसरातील यशस्वी विद्यार्थ्यांची उदाहरणे देत यशाचे गमक विद्यार्थ्यांना सांगितले.

अध्यक्षीय समारोपात श्रीमती चाटे बी.बी. यांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे व सांस्कृतिक कार्यक्रतील सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्या म्हणाल्या यश मिळविण्यासाठी अभ्यासातील सातत्य,जिद्द चिकाटी गरजेची आहे.

कार्यक्रमाच्या शेवटी सातवीच्या विद्यार्थ्यांनी शाळेला आठवण म्हणून भेटवस्तू दिली व अल्पोपहारानंतर ओल्या डोळ्यांनी कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्री.क्षीरसागर आर.एस.यांनी केले तर आभार श्री. देशमुख ए. डी.यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी श्री.डिरंगे जी.बी,श्री. मस्के जे. आर. व श्रीमती ध्वजा गायकवाड या शिक्षक वृंदांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमासाठी सर्व विद्यार्थी हजर होते.

## चाकूर नगरपंचायतीच्या उपनगराध्यक्षपदी साईप्रसाद हिप्पाळे



चाकूर (वा ) येथील नगरपंचायतीच्या उपनगराध्यक्षपदासाठी दि.९ रोजी बुधवारी नगरपंचायत सभागृहात सकाळी १० वाजता उपविभागीय अधिकारी तथा पिठासन अधिकारी मंजुषा लटपटे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सभा संपन्न झाली.यावेळी नगराध्यक्ष कपिल माकणे,मुख्याधिकारी प्रतीक लंबे उपस्थित होते.यात उपनगराध्यक्षपदासाठी साईप्रसाद शिवराज हिप्पाळे यांचा एकमेव अर्ज आल्यामुळे त्यांची उपनगराध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. येथील नगरपंचायतीच्या उपनगराध्यक्षपदाचा अरविंद बिरादार यांनी नगराध्यक्ष कपिल माकणे यांच्याकडे २८ मार्च रोजी राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या उपनगराध्यक्ष पदासाठी दि.९ रोजी बुधवारी नगरपंचायत सभागृहात सकाळी १० वाजता उपविभागीय अधिकारी तथा पिठासन अधिकारी मंजुषा लटपटे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सभा संपन्न झाली.यावेळी साईप्रसाद शिवराज हिप्पाळे यांचा उपनगराध्यक्षपदासाठी एकमेव नामनिर्देशनपत्र अर्ज दाखल झाल्यानंतर अर्जाची छाननी झाली. यात एकच अर्ज दाखल झाल्यामुळे साईप्रसाद शिवराज हिप्पाळे यांची उपनगराध्यक्षपदी बिनविरोध निवड झाल्याचे पिठासन अधिकारी मंजुषा लटपटे यांनी जाहीर केले.नगराध्यक्ष कपिल माकणे व गटनेते करीमसाब गुळवे यांच्या हस्ते नूतन उपनगराध्यक्ष साईप्रसाद हिप्पाळे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी गटनेते करीमसाहेब गुळवे,माजी उपनगराध्यक्ष तथा नगरसेवक अरविंद बिरादार,मिलिंद महालिंगे,अभिमन्यू धोंडगे,भागवत फुले,नितीन रेड्डी,मुजम्मिल सय्यद,नगरसेविका हिरकणबाई लाटे,गोदावरी पाटील,ज्योती स्वामी,शाहीनबानू सय्यद,शुभांगी कसबे,वैशाली कांबळे,शबाना सय्यद,सुजाता रेड्डी,गंगुबाई गोलावार आदी उपस्थित होते.

## 'फुले' चित्रपट तत्कालीन वास्तव दाखवणारा-डॉ.हुलगेश चलवादी टिझरच्या आधारे नाहक वाद निर्माण करणे चुकीचे

पुणे / प्रतिनिधी :- जातीय तेढ निर्माण होईल,अशी भीती व्यक्त करीत आगामी काळात प्रदर्शित होणाऱ्या 'फुले' चित्रपटातील काही दृश्यांवर आक्षेप घेणे असमर्थनीय तसेच पुर्णत: चुकीचे आहे. तत्कालीन सामाजिक स्थितीचे वास्तव दाखवत प्रस्थापितांच्या डोळ्यात झंणझणीत अंजन घालण्याचे काम 'फुले' चित्रपटातून केले जाईल, असे प्रतिपादन बहुजन समाज पक्षाचे प्रदेश महासचिव आणि पश्चिम महाराष्ट्र झोन मुख्य प्रभारी डॉ.हुलगेश चलवादी यांनी गुरूवारी (ता.१०) केले. टिझरच्याआधारेकाहींकडूनचित्रपटासंदर्भात नाहक वाद निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातोय.समाजाचे वास्तविक प्रतिबिंब चित्रपटातून दिसते.सामाजिक स्थितीचे आकलन विविध चित्रपटातून यापूर्वी देखील करण्यात आले आहे. फुले दाम्पत्याने स्त्री शिक्षणासाठी घेतलेले कष्ट सर्वश्रुत आहे. इतिहासाचे विद्रुपिकरण करणे अयोग्यच आहे, पंरतु, दाहक सत्य रुपेरी पडद्यावर मांडतांना दिग्दर्शकांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यांचे हनन होणार नाही; याची काळजी समाजाने घेतली पाहिजे, असे डॉ.चलवादी म्हणाले. फुले दाम्पत्याला तत्कालीन समाजकंटकांकडून मिळालेली घृणास्पद वागणूक पडद्यावर साकारणे अयोग्य आणि भावना भडकवणारे कसे? असा सवाल डॉ.चलवादी यांनी व्यक्त केला.



स्त्री शिक्षणाचा वसा घेतलेले क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा आणि सावित्रीमाई फुले यांनी हे सर्व सहन केले. सावित्रीमाईंवर शेण फेकले जायचे. अशात दोन लुगडी घेवून त्या शाळेत जायच्या. अंगावर शेण फेकल्यानंतर शाळेत गेल्यावर स्वच्छ होवून दुसरे लुगडे परिधान करीत स्त्री शिक्षणाचे कार्य करायच्या.तत्कालीन समाजकंटकांनी केलेला अन्याय चित्रपटाकून दाखवण्याचे कार्य केले जात असेल तर याला विरोध का? असा सवाल डॉ.चलवादी यांनी उपस्थित केला. 'चित्रपट एकतर्फी नको, सर्वसमावेश असावा' असे मत दृश्यांवर आक्षेप घेणाऱ्यांकडून व्यक्त करण्यात आले आहे. पंरतु, चित्रपटाच्या माध्यमातून समोर येणारे तत्कालीन सामाजिक स्थितीचे वास्तव सर्वसमावेशकच असते.सर्वसमावेशकती भावना केवळ शब्दांपुरती मर्यादित ठेवून चालणार नाही. पीडित, शोषित, वंचितांचे जीवन नाकारणाऱ्यांमध्ये 'सर्वजन हिताय,सर्वजन सुखाय' ही भावना रुजवावी लागेल, असे मत डॉ.चलवादी यांनी व्यक्त केले. चित्रपटाच्या निमित्ताने बहुजनांवर सांस्कृतिक दबाव निर्माण केला जातोय. बहुजनांवर आतापर्यंत टाकण्यात आलेला सांस्कृतिक प्रभाव आणि दबावातून मुक्त होण्याची वेळ आली आहे. चित्रपटातील सत्यदर्शक आणि वास्तव दृश काढून नये. खरा इतिहास लोकांसमोर आलाच पाहिजे, असे आवाहन डॉ.चलवादी यांनी केले.

## कानडी माळी येथे २००७ -२००८ च्या बॅचचा गेट टुगेदर

केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील कानडी माळी शाळेतील २००७-२००८ च्या बॅचचा शिक्षक व विद्यार्थी रविवार दि.६ एप्रिल २०२५ रोजी एकत्रित करून गेट टुगेदर मेळावा आयोजित करण्यात आला.या कार्यक्रमाचे अध्यक्ष कानेश्वर विद्यालय कानडी माळी शाळेचे सेवावृत्त अपग्रेड मुख्याध्यापक अंबादास भिवाजी राऊत हे होते.



यावेळी सर्वप्रथम त्यागमुर्ती रमामाई आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पुजन करून अभिवादन केले.यावेळी प्रत्येक माजी विद्यार्थी-विद्यार्थिनिंनी आपले मनोगत व्यक्त केले.जुन्या आठवणी सांगितल्या.विशेष रुपाली राऊत (नाईकनवरे), चंद्रभागा नाईकनवरे (राऊत) यांनी सविस्तर आपले विचार व्यक्त केले.माजी विद्यार्थिनींना त्यांचे पती घेऊन आले होते,त्यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.राऊत डी.टी.,गिरी दिगंबर, शसंतोष गरडे,अनंत गवळी, श्रीमती कंकु शेळके मॅडम, छायाताई राऊत यांनी आपले मनोगत व्यक्त केले. मोबाईल ही वस्तु चांगली तयार केली आहे परंतु त्याचा योग्य वापर करून आपण आपले जीवन आनंदीमय जगावे, ताणतणाव न घेता आपण आपल्या आयुष्यात सदैव आनंदी राहावे, त्यामुळे आपणास आरोग्यं धनसंपदा लाभते असे राजाभाऊ कदम अपग्रेड मुख्याध्यापक जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी केंद्र लव्हुरी ता.केज तथा माजी सहशिक्षक जि.प.उच्च प्रा.शा. कानडी माळी यांनी मत व्यक्त केले.या कार्यक्रमाचे बाळासाहेब खाडे यांनी उत्कृष्ट नियोजनाने केले व उत्तम असे सुत्रसंचलनही केले.यावेळी जिल्हा परिषद शाळेकडे आपण सर्वांनी विशेष लक्ष देण्याची गरज असल्याचे सांगून आपण पालक म्हणून सहकार्य करावे असे आवाहन अंबादास राऊत यांनी केले.यावेळी आभार चंद्रभागा नाईकनवरे (राऊत) यांनी मानले.शिवशंकर राऊत,किरण राऊत, अरुण राऊत, राहुल बनसोडे,मनोज मस्के,लता बनकर, चंद्रभागा नाईकनवरे,लता पाखरे, प्रियंका मस्के, मंजुषा राऊत प्रियंका शिंदे इ.या शाळेचे माजी विद्यार्थी - विद्यार्थिंनी , शिक्षक -शिक्षिका उपस्थित होते.

## संपादकीय....

# उत्पादन क्षेत्रातील वाढती आव्हाने

भारताच्या उत्पादन क्षेत्राचे जीडीपीत १५.१७ टक्के योगदान राहिले आहे. सरकारने आर्थिक वर्ष २०२५ पर्यंत या क्षेत्राचे योगदान २५ टक्क्यापर्यंत वाढण्याचे ध्येय ठेवले आहे. विद्युत उपकरण, कच्चा धातू आणि मोटार वाहन यासारख्या प्रमुख उद्योगांत विशेष कामगिरी केल्याने या क्षेत्रात सातत्याने विकास झाला आहे. उत्पादन क्षेत्र हे प्रामुख्याने मनुष्यबळावर अवलंबून आहे. या क्षेत्रात उत्पादन वाढले असले, तरी आर्थिक विश्लेषकांकडून मात्र अजूनही कामगिरीच्या आघाडीवर चिंता व्यक्त केली जात आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेत उत्पादन क्षेत्राची मोलाची भूमिका राहिली आहे आणि पुढेही राहील; मात्र गेल्या काही वर्षांत याची गती तुलनेने संथच राहिली आहे. उत्पादन क्षेत्रात कच्चा माल हा पक्का केला जातो. या क्षेत्रात विविध, अजस्त्र मशिन, उपकरण, कामगार शक्तीचा वापर होतो. जैविक किंवा रासायनिक प्रक्रिया किंवा निर्मितीचाही यात समावेश असतो. उत्पादित साहित्याचा वापर स्वत:साठी किंवा विक्री करण्यासाठी केला जातो. शिवाय या क्षेत्रात टिकाऊ सामानाच्या तुलनेत न टिकणार्या सामानाची निर्मिती ही अधिक होते. एकप्रकारे हे क्षेत्र देशाची जडणघडण, रोजगाराची संधी निर्माण करणे, वस्तू आणि सेवा पुरवठा तसेच पायाभूत आराखडा तयार करण्यात योगदान देतात. देशात या क्षेत्रातील उत्पादनावर प्रकाश टाकला, तर आर्थिक वर्ष २०२३ मध्ये भारताचे उत्पादन ४५५.७७ अब्ज डॉलर होते आणि त्याच्या मागच्या वर्षी २०२२ मध्ये ते ४४०.०६ अब्ज डॉलर राहिले आहे. हा विकास ३.५७ टक्के अधिक आहे. भारताच्या उत्पादन क्षेत्राचे जीडीपीत १५.१७ टक्के योगदान राहिले आहे.

भारत सरकारने आर्थिक वर्ष २०२५ पर्यंत या क्षेत्राचे योगदान २५ टक्क्यापर्यंत वाढण्याचे ध्येय ठेवले आहे. २०२२-२३ च्या अर्थसंकल्पात भारत सरकारने इलेक्ट्रॉनिक्स आणि आयटी हार्डवेअर उत्पादनाला चालना देण्यासाठी २,४०३ कोटी रुपयांचा निधी दिला होता. २०२१-२२ मध्ये इलेक्ट्रिक-हायब्रिड वाहनांच्या निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी 'फेम इंडिया' महत्त्वाची ठरली आणि यानुसार ७५७ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली. उत्पादन क्षेत्राला चालना देण्यासाठी आणखी काही योजना सरकारने आणल्या आहेत. यात 'मेक इन इंडिया' याचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. देशांतर्गत उत्पादनात उत्पादन क्षेत्राचा वाटा वाढविण्यासाठी आणि विकासासाठी लक्ष दिले जात आहे. सरकारने या क्षेत्रात परकी गुंतवणुकीला आकर्षित करण्यासाठी विशेष आर्थिक क्षेत्रही (सेज) स्थापन केले आहे. उत्पादन क्षेत्र हे प्रामुख्याने मनुष्यबळावर अवलंबून आहे. या क्षेत्रात उत्पादन वाढले असले, तरी अजूनही कामगिरीच्या आघाडीवर चिंता व्यक्त केली जात आहे. व्यापार धोरणात सातत्याचा अभाव आणि कायद्यातील किचकट तरतुदी तसेच प्रभावहीन शैक्षणिक अणि कौशल्य व्यवस्था या गोष्टी उत्पादन क्षेत्रावर परिणाम करणार्या आहेत. उद्योगाच्या वार्षिक सर्वेक्षणानुसार सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगाचा देशांतील एकूण कारखान्याच्या तुलनेत ९६ टक्के वाटा आहे. यातही दहापेक्षा कमी कर्मचारी असलल्या सूक्ष्म उपक्रमांचा वाटा ९९ टक्के आहे. या उपक्रमात रोजगारनिर्मितीचा वेग हा अपेक्षेपेक्षा कमीच आहे. अर्थशास्त्रज्ञ अरविंद सुब्रह्मण्यम यांच्यासह अन्य विश्लेषकांच्या मते, उद्योगासंदर्भातील 'एएसई'च्या वार्षिक अहवालातील आकडेवारीचे आकलन करताना प्रत्यक्षात समस्या अधिक आहेत. 'एएसई'ने बड्या कारखान्यांची संख्या फुगवली आहे.

अनेक कंपन्या एकाच राज्यात वेगवेगळे उत्पादन करत असतात. वास्तविक, एकाच कंपनीचे वेगवेगळे कारखाने असतात; मात्र सर्वेक्षणात त्यांना एक मोठा कारखाना म्हणून सादर केला आहे. साहजिकच यासंबंधीच्या आकडेवारीत गडबड होते. अनेक मोठ्या प्रणाली अनेक कारणांमुळे मोठे उत्पादक म्हणून सिद्ध होतात; पण लहान प्रणालीला आणखी वेगळ्याच अडचणी आहेत आणि त्याची तपासणी व सुधारणा करण्याची गरज आहे. मोठ्या प्रणालीत भांडवली गुंतवणूक अधिक राहू शकते आणि या जोरावर ते मूल्य साखळीत लवकर आघाडी घेतात. अशावेळी या आघाडीवर लहान कारखान्यांची पीछेहाट होते. भारतात उत्पादन क्षेत्राला अनेक आव्हानांचा सामना करावा लागत आहे. यात पायाभूत आराखड्याचा अभाव, कुशल मनुष्यबळ नसणे, कर्ज मिळवण्यातील अडचणी आदींचा समावेश आहे. याशिवाय जागतिक मागणीत झालेली घट आणि चीनसारख्या देशांकडून निर्माण होणार्या स्पर्धेचाही यावर परिणाम होत आहे. चांगली आणि वेगवान दळणवळण सुविधा ही प्रामुख्याने शहरांपुरतीच मर्यादित आहे. बहुतांश राज्यांतील वीज मंडळे तोट्यात आहेत. ती दयनीय स्थितीत आहेत. सामान्यपणे लघू आणि मध्यम उद्योग कर्ज सुविधेपासून वंचित राहत आहेत आणि म्हणून त्यांना भांडवल उभारताना नाकिनऊ येते. भारताच्या उत्पादन क्षेत्रात प्रशिक्षित अणि कुशल मनुष्यबळाचा अभाव आहे आणि या क्षेत्राच्या विकासाला तो बाधा आणत आहे. उत्पादन क्षेत्र लालफितीचा कारभार, निविदा आणि लेखा परीक्षणासारख्या अनेक किचकट नियमांत अडकला आहे. ते व्यवसायाला ओझे ठरणारे आहे आणि विकासात अडचणी आणत आहेत. याशिवाय कमकुवत आणि अनियोजित पुरवठा साखळीच्या ढिसाळ व्यवस्थापनातून खर्चात वाढ होताना दिसते. भारताच्या उत्पादन क्षेत्राला अन्य देशांच्या तीव्र स्पर्धेचा सामना करावा लागतो आणि त्यामुळे देशांतर्गत व्यवसायाला जागतिक बाजारात टिकून राहणे कठीण जाते.

# मुलं भलत्याची शिकती- महात्मा फुले


महात्मा फुले हे विषमतावादी व्यवस्थेला सुरुंग लाऊन अंधविश्वास, पाखंड यांची चिरफाड करून धर्म, अंधविश्वास व थोतांडाला ज्यांनी पोटभरण्याचे साधन माणले अशा सर्व धुर्त, कपटी लोकांचे कर्दनकाळ आहेत. विषमता, पाखंड, थोतांड, अंधविश्वास समाजात पसरवून स्वतः च स्वतः ला उच्च समजणारे धुर्त लोकांसाठी महात्मा फुले हे खुप मोठे आव्हान आहेत. देशात हजारो वर्षापासून विषमतावादी व्यवस्था निर्माण करून माणसाला माणसा पासून दुर करण्याचे काम कोणी केले? भारत देशाचे, माणुसकीचे, मानवतेचे, सर्वांगीण विकासाचे खरे शत्रु कोण आहेत हे सर्वांना माहिती आहे. परंतु जातीव्यवस्था एवढी मजबूत होऊन बसली आहे की वरच्या जातीतील लोकांनी लाथा जरी मारल्या तरीही तो आर्शिवाद वाटतो. आणि खालच्या जातीतील लोकांनी चांगला मार्गही दिला तरीही तो मनाला सलतो. शिक्षण, मानवी स्वातंत्र्य, वैचारिक स्वातंत्र्य, अंधविश्वास, पाखंड, थोतांडावर बोलणारा व्यक्ती आजही अनेकांना धर्मविरोधी वाटतो. कारण आजही लोकांच्या मेंदुचा पाहिजे तसा विकास झाला नाही. आणि व्यवस्थेतील कपटी व धुर्त लोक आजही धर्माच्या नावाखाली सर्वसामान्य लोकांचा वापर करून त्यांना माणसिक गुलाम बनवत आहेत. जर महात्मा फुले वाचले आणि समजून घेतले तर आपल्याला खऱ्या शत्रुची ओळख होते. परंतु आपण महात्मा फुले यांना च घराबाहेर काढले. कारण आपण आपल्या मेंदुचा वापर आजही स्वतःच्या हितासाठी करत नाही हे सत्य आहे.

महात्मा फुले यांनी सर्वात जास्त महत्त्व शिक्षण, सामाजिक समता, विज्ञानवाद याला दिले. आज खरंच महात्मा फुले यांच्या विचाराचा देश बनला का हा महत्त्वाचा प्रश्न असुन चिंतेची बाब आहे. महात्मा फुले म्हणतात..

ब्राह्मण पंतोजी करीती हो। शुद्राच्या शिक्षणाणी माती हो।<br>
सांगतो तुम्हा प्रचिती हो।<br>
माळ्या कुणब्यांचा बोध करून रात्री पोथ्या वाचती।<br>
आपले महत्त्व शिकवीती।<br>
भलतीच थाप देती सिध्यावर दक्षीणा घेती।<br>
मुले ती भरल्याची शिकती।<br>
सिद्ध साधक होऊन करीती जातीची बढती।<br>
कोणी घेईना यांची झडती।<br>
आंधळे दळती सर्व त्यांचे कुत्रे पिठ खाती।<br>
मुले ही भलत्याची शिकती।

जाती धर्माची चुकिची माहिती देऊन कुणबी माळी थोडक्यात आजच्या हिंदु धर्मातील जातीच्या मुलांना चुकिच्या पद्धतीने पोथी पुराण सांगायचे, स्वयंघोषीत लोकांनी स्वतः चेच वर्चस्व स्वतः च सांगुन इतरांना कमी व तुच्छ मानायचे. मानसाला माणुस म्हणून न वागवणारे आणि माणसाच्या कर्म व गुणांची कदर न करता निव्वळ जाती धर्माच्या आधारे श्रेष्ठत्व ठरवणारे किती निच असतील याची कल्पना येतेच. वरिल महात्मा फुले यांच्या ओव्या जरी बघितल्या तरीही आपल्या लक्षात सत्य परिस्थिती येते. शिक्षणाची मक्तेदारी एकाच वर्गाची मुळीच नाही. परंतु मराठा कुणबी, माळी, साळी, तेली ज्या काही जाती बहुसंख्य आहेत त्यांना अगोदरही शिक्षण बंदी होती, चुकिचा धर्म डोक्यात घालून लोकांना अज्ञानी व अंधविश्वासु बनवण्याचे काम सुरू होते.

भारतीय संविधानाच्या माध्यमातून आता कुठे शिक्षण मिळत होते परंतु हि व्यवस्था पद्धतशीर पणे आपले शिक्षण बंद करून पुन्हा धर्माच्या नावाखाली विषमता मजबूत करण्याचे काम करत आहे. आजही जाती धर्माच्या नावाखाली तरुणांना भडकवले जाते, दंगली घडवून आणल्या जातात दंगली मध्ये तरुणांवर गुन्हे दाखल होतात परिणामी शिक्षण व नोकरी पासून मुलं मुकतात. जे लोक दंगली घडतील असे वक्तव्य करतात, धर्म धोक्यात आहे अशा बतावण्या करतात तेव्हा सर्वसामान्य लोकांची मुलं रस्त्यावर धर्माच्या रक्षणासाठी येतात आणि ज्यांनी वक्तव्य केले, ज्यांना वाटतो धर्म धोक्यात आहे त्यांची मुलं मात्र आजही विदेशात शिकतात. म्हणून महात्मा फुले म्हणतात शुद्राच्या अधोघतीचे मुख्य कारणच हे अविद्या अर्थात शिक्षण आहे. शुद्रांनी शिक्षण घ्यायला पाहिजे परंतु शुद्रांची मुले खोट्या व चुकिच्या पद्धतीने सांगण्यात येणाऱ्या धर्माच्या जाळ्यात अडकले त्यामुळे भलत्याचीच मुले आजही शिक्षण घेत आहेत. आज शिक्षणाचा प्रसार झाला असे मानले जाते परंतु लोक जागृत नाहीत म्हणून जेव्हा जेव्हा शुद्र शब्द येतो तेव्हा तेव्हा शुद्र लोक महारांकडे बघतात. अरे शुद्र म्हणजे महार नाही महार मांग यांना तर महात्मा फुले अतिशुद्र म्हणतात. म्हणून शुद्र जोपर्यंत जागृत होणार नाही तोपर्यंत त्याचा सर्वांगीण विकास होणार नाही. महात्मा फुले यांनी तरूणांच्या व विषेशतः स्त्रियांच्या हाती शिक्षण देऊन सामाजिक क्रांती केली. धर्मांनी आणि धर्मग्रंथांनी, धर्माच्या ठेकेदारांनी सर्वसामान्य माणसाचे शिक्षण नाकारुन त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांना माणसिक गुलाम बनवणाऱ्यांना माणूस कसं म्हणावं? हजारो वर्षापासून शिक्षणापासून दुर ठेवलेल्या समाजाला शिक्षण मिळावे म्हणून महात्मा जोतीराव फुले समोर येतात तर महिलांना, शुद्रांना जर शिक्षण दिले तर धर्म बुडतो म्हणणारे लोक खरंच धर्माचे असतील का? आणि महिला व मानसाच्या शिक्षणाने खरंच जगातील एखादा धर्म तरी बुडत असेल का? मग भारतात राहणारा धर्मच शिक्षणाने बुडत असेल तर एवढा कमकुवत धर्म निर्माण केलाच कशाला? शिक्षणाने कोणताही धर्म बुडत नाहीत तर शिक्षण घेतल्याने व्यक्ती जागृत होतो. आणि जागृत व्यक्तीमुळे धर्माचे ठेकेदार, थोतांड, पाखंड अंधविश्वास यावर ज्याचे पोट आहे तो धंदा बुडण्याची भिती असते. लोकांच्या अज्ञानावर, अंधविश्वास व थोतांडाच्या माध्यमातून लोकांची लुट करणाऱ्यांनाच शिक्षणाची भिती वाटते. धर्माच्या नावाखाली अंधविश्वास, पाखंड, थोतांडाचाची जोपासाना करून त्याचा संबंध थेट धर्माशी जोडून लोकांना धर्माविषयी भावनिक करणारे त्या भावनेवर जगणारे लोक किती कमकुवत व धुर्त असतील हे दिसुन येते. आजही धर्माच्या जातीच्या नावाखाली तरुणांच्या हातात पेना ऐवजी दगड दिला जातो. आणि स्वतःच्या मुलांना मात्र शिक्षण देऊन अधिकारी बनवले जाते. ह्या




गोष्टी बहुजन समाजाच्या आजही लक्षात येत नाहीत. महात्मा फुले समाजसुधारक नव्हे तर क्रांतिकारक आहेत परंतु शोकांतिका हि आहे की या क्रांतीकारकांचा संदेश लोकांना अजुनही समजला नाही आणि म्हणून त्यांचा उद्देश आजही पुर्ण झालेला दिसत नाही. ज्या बहुसंख्य लोकांच्या मुलांनी शिकुन अधिकारी व्हायचे, राजसत्ता व अर्थसत्ता चालवायची त्यांची मुले बेरोजगार तर काही जेल मध्ये आहेत आणि विषमता वादी, जातीव्यवस्था बळकट करून स्वतः चे वर्चस्व कायम ठेलणाऱ्या धुर्त लोकांची मुले मात्र शिक्षण घेत आहेत. महात्मा फुले यांचे कार्य शिक्षण, रोजगार, शेती, कामगार अशा सर्व बाजुंनी आहे. परंतु महात्मा फुले यांनी अंधविश्वास, भोंदुगिरी, थोतांड झुगारून दिले तर मनुवादी वृत्तीच्या लोकांनी महात्मा फुलेंचे कार्य लोकांपर्यंत पोहचुच दिले नाही. म्हणुन आजही सामाजिक क्रांतीचे प्रणेते महात्मा जोतीराव फुले हे मर्यादितच आहेत. महात्मा फुले यांनी सामाजिक समतेसाठी आपले आयुष्य खर्ची घातले. शिक्षणावर भर दिला कारण शिक्षणामुळे मानुस जागृत होतो. परंतु आजचा विचार केला तर महात्मा फुळे अनेक जन शकले परंतु जागृत झाले नाही आणि आजही ते महात्मा फुले यांना सोडून ज्यांनी मानसिक गुलाम बनवले त्यांनाच सलामी देण्यासाठी तयार आहे. म्हणजे आजही बहुतांश लोक जागृत झाले नाही. महात्मा फुले यांच्या शाळेतील इयत्ता चौथीची मुलगी मुक्ता साळवे आमचा धर्म कोणता कोणता म्हणुन थेट प्रश्न करते आणि आम्हाला खायला काही नाही पाहिजे पण वाचनालयाची मागणी करते. आजचा सुशिक्षित तरुण अंधविश्वास, पाखंड, थोतांड यामध्ये एवढा तल्लीन झालेला आहे कि त्याच्या डोक्यात फक्त धर्म धोक्यात आहे एवढेच येते. शिक्षण, नोकरी, रोजगार, विचार, स्वाभिमान, शेतकरी, महिला धोक्यात आहेत ह्याची जाणीव च राहली नसेल तर यांना शिक्षीत कसे म्हणावे? म्हणून चार ओळी लिहू वाटतात.

पेना ऐवजी दगड तुझ्या हाती<br>
धर्माच्या नावाखाली जेलमध्ये जाती<br>
फिरतो बेरोजगार गावगुंड तुझी ख्याती<br>
मुलं भलत्याची शिकती

महात्मा फुले यांची जयंती साजरी करतांना महात्मा फुले यांचे विचार व कार्य समजून घेऊन जागृत होणे गरजेचे आहे. तरच महात्मा फुले यांची जयंती साजरी केल्याचे सार्थक होईल. महात्मा फुले जयंती च्या मंगलमय सदिच्छा..

**********

विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर
मोबा: ९१३०९७९३००

# समतावादी, युगपुरुष महात्मा ज्योतिराव फुले!

विद्येविना मती गेली!<br>
मतीविना नीती गेली!<br>
निती विना गती गेली!<br>
गतीविना वित्त गेले!<br>
वित्तविना शुद्र खचले!<br>
इतके अनर्थ एका अविद्येने केले!


अशी महान शिकवण देणारे, सत्यशोधक समाजाचे संस्थापक, प्रखर राष्ट्रवादाच्या फुलोऱ्यातून फुललेले समतावादी युगपुरुष म्हणजे महात्मा ज्योतिराव फुले. ते एक थोर भारतीय समाज सुधारक, लेखक, विचारवंत व क्रांतिकारक महात्मा होते. त्यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी सातारा जिल्ह्यातील कटगुण येथे झाला. त्यांचे पूर्ण नाव ज्योतिराव गोविंदराव फुले व त्यांच्या आईचे नाव चिमणाबाई होते.

वयाच्या तेराव्या वर्षी त्यांचा विवाह सावित्रीबाई फुले यांच्याशी झाला. माध्यमिक शिक्षणासाठी पुण्यात स्कॉटीश मिशन हायस्कूलमध्ये त्यांनी प्रवेश घेतला. अभ्यासात खूप हुशार असल्याने पाचसहा वर्षातच त्यांनी अभ्यासक्रम पूर्ण केला. महात्मा फुले यांच्यावर 'थॉमसपेन' यांच्या 'राईट ऑफ मॅन' या पुस्तकाचा प्रभाव पडला. त्यांनी विषमता दूर करण्यासाठी स्त्री - शिक्षण व मागासलेल्या मुलां- मुलींचे शिक्षण यावर भर दिला. ज्या काळात अस्पृश्यांच्या मुलांना शिक्षण मिळणे कठीण होते, अशा वेळी स्त्री - शिक्षणाची ज्योत पेटवणारे ज्योतिराव फुले हे भारतीय स्त्री शिक्षणाचे प्रमुख उद्गाते समजले जातात.

स्त्री शिक्षणाला महत्त्व देवून पुण्यामध्ये त्यांनी अतिकष्टप्रद अनुभव सोसले. स्वतःची पत्नी म्हणजेच सावित्रीबाई फुले यांच्या मदतीने पुण्यात त्यांनी तीन शाळा सुरू केल्या. त्यांच्या कामाची पोच पावती म्हणून त्यांचा विश्राम बागवाड्यात जाहीर सभेत मानाचा सत्कार करण्यात आला.

घरातील एक स्त्री शिकली की कुटुंब शिकते'' ''ज्ञान ही एक शक्ती आहे.'' ''नीती हाच मानवी जीवनाचा आधार आहे.'' असे विचार ज्योतिरावांनी मांडले.

सत्यशोधक समाजाची स्थापना २४ सप्टेंबर १८७३ रोजी महात्मा फुले यांनी केली. त्यांचा उद्देश सामाजिक सुधारणा आणि समानता प्रस्थापित करणे होता. ज्योतिबा फुले यांनी गुलामगिरी यांसारखी पुस्तके लिहिली ज्यामध्ये त्यांनी सामाजिक विषमतेवर भाष्य केले. जमीनदार, शेटजी व पूरोहितांकडून होणाऱ्या अन्याय, अत्याचारापासून, गुलामगिरीतून शूद्रतिशूद्र समाजाची मुक्तता करणे व त्यांना हक्काची जाणीव करून देणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. त्यांनी 'शेतकऱ्यांचा आसूड' हा ग्रंथ लिहून शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडली.




समाजाच्या परंपरागत दृष्ट रुढींवर आघात करून समाज परिवर्तन घडवण्याचे कार्य करणाऱ्या व्यक्तींना समाज कोणत्या नजरेने बघतो, हे काही वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. अशा लोकांना त्यांच्या कुटनीतीची कानउघाडणी करून समाजाच्या पुनरस्थापनेचे रणशिंग त्यांनी फुंकली. शिक्षणासारख्या माध्यमाच्या जोरावर राष्ट्र तारण्याचे त्यांचे स्वप्न त्यांनी परिपूर्ण केले. समाज नितिनियमात बदल करून, समाज परिवर्तन घडविण्यासाठी अस्पृश्य लोकांना मानवतेची वागणूक दिली पाहिजे, मानव इथून - तिथून एकच असतो, जातीभेद मानू नये, सर्वांनी समतेने वागावे यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रखर लढा दिला. म्हणूनच त्यांना जनतेने महात्मा हा किताब बहाल केला.

आपले संपूर्ण जीवन समाजासाठी वाहिले म्हणून लोकांनी त्यांना 'महात्मा' म्हणून गौरविले. त्यांना 'स्त्री शिक्षणाचे जनक' असेही म्हणतात. त्यांनी धर्माच्या नावावर होणाऱ्या शोषणाला विरोध केला. कर्मकांड व रुढी यावर टीका केली. तरी ते नास्तिक नव्हते. ते ईश्वराला नार्मीक म्हणत. सर्वांचा नियंत्रक - नर्मीक, असा ते उल्लेख करत. सर्वांचा एकाच धर्म असावा एकच धर्म, एक ईश्वर असावा.मूर्तीपूजा, अवतार अशा कल्पनांना त्यांनी विरोध केला. ईश्वनिष्ठा मानवतावाद या धार्मिक विचाराचा पाया त्यांनी रोवला. ईश्वर उपासनेला मध्यस्ताची गरज नाही. ईश्वरावर विश्वास, सत्याचा शोध आणि नीतीची जोपासना ही तीन तत्त्वे त्यांच्या धर्मविषयक विचारांचा गाभा आहे.

ज्योतिराव फुले यांनी २८ नोव्हेंबर १८९० रोजी महाराष्ट्रातील पुणे येथे जगाचा अखेरचा निरोप घेतला. मात्र, त्यांचे कार्य समाजात आजही प्रेरणादायी ठरत आहे.

म्हणून त्यांच्याबद्दल एक कवी म्हणतो की, स्त्री शिक्षणाचे तुम्ही रोपटे लाविले...त्याचेच आज भव्य वृंदावन झाले, फळा-फुलांनी ते सर्व बहरले... त्या फळा-फुलातुन आज आवाज निघतो, महात्मा फुले, महात्मा फुले...!

*********

कु.राधिका रमेश व्यवहारे
जी.प. मराठी उच्च प्राथ. शाळा उकळी बु।
ता. संग्रामपूर जि. बुलढाणा

# चिनी विस्तारवादाला 'नवे इंधन'

चीनमध्ये नव्याने सापडलेले तेलक्षेत्र चीनच्या तेल उत्पादनात भर घालू शकते. मात्र, त्याचा प्रत्यक्ष परिणाम किती होईल, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. दक्षिण चीन समुद्र हा आशिया खंडातील एक महत्त्वाचा जलमार्ग आहे, जो व्यापार, सामरिक महत्त्व आणि नैसर्गिक संसाधनांनी समृद्ध आहे. या समुद्राखालील तेल आणि नैसर्गिक वायूच्या साठ्यांमुळे अनेक देशांच्या हितसंबंधांचा केंद्रबिंदू बनला आहे. अलीकडेच चीनच्या नॅशनल ऑफ्शोअर ऑइल कॉर्पोरेशनने या समुद्राच्या पूर्व भागात मोठ्या तेलक्षेत्राचा शोध लावल्याची घोषणा केली आहे. या तेलक्षेत्रात १० कोटी टनांहून अधिक प्रमाणात साठे असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

हुयझोऊ १९-६ तेलक्षेत्र हे दक्षिण चीनच्या ग्वांगडोंग प्रांतातील शेन्झेनपासून सुमारे १७० किमी अंतरावर आहे, असे बीजिंगच्या शिन्हुआ वृत्तसंस्थेने म्हटले आहे. या ठिकाणी झालेल्या चाचणी उत्खननातून दररोज ४१३ बॅरल कच्चे तेल आणि ६८ हजार घनमीटर नैसर्गिक वायू मिळत असल्याचे सांगण्यात येत आहे. दक्षिण चीन समुद्राच्या पूर्व भागात तेल व वायू संशोधनात सलग दुसर्या वर्षी चीनला मोठे यश मिळाले आहे. चीन हा जगातील सर्वात मोठा कच्च्या तेलाचा आयातदार आहे. २०२३ मध्ये चीनने दररोज ११.१ दशलक्ष बॅरल कच्च्या तेलाची आयात केली.

चीनसाठी हा शोध कितीही महत्त्वाचा असला तरी इथे मुख्य प्रश्न आहे तो संपूर्ण दक्षिण चीन समुद्रावरील त्याच्या दाव्याचा. कारण, या भागावर फ्लिलिपाइन्स, मलेशिया, व्हिएतनाम, इंडोनेशिया आणि ब्रुनेई यांचादेखील हक्क आहे. त्यामुळे या तेलशोधाच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापण्याची शक्यता आहे. याचे कारण व्हिएतनाम आणि मलेशिया यांनी आपली ऊर्जा गरजा भागवण्यासाठी दक्षिण चीन समुद्रात ऑफ्शोअर ड्रिलिंग प्रकल्पांमध्ये गुंतवणूक वाढवली आहे. फ्लिलिपाइन्स, इंडोनेशियादेखील या क्षेत्रातील तेल आणि वायू शोधमोहिमांमध्ये सक्रिय सहभाग घेत आहेत. चीनला दक्षिण चीन समुद्रावर एकहाती अमल हवा आहे.

चीनची विस्तारवादी मानसिकता नवीन नाही. २००० वर्षांपूर्वीच्या हान साम्राज्याच्या ऐतिहासिक दस्तऐवजांचा आधार घेत, चीन संपूर्ण दक्षिण चीन समुद्रावर हक्क सांगत आहे. या समुद्राची भौगोलिक परिस्थिती पाहता, तो चीनच्या दक्षिणेस, व्हिएतनामच्या पूर्व व दक्षिणेस, फ्लिलिपाइन्सच्या पश्चिमेस आणि बोर्नियो बेटाच्या उत्तरेस पसरलेला आहे. याच्या आसपास चीन, तैवान, फ्लिलिपाइन्स, मलेशिया, ब्रुनेई, इंडोनेशिया, व्हिएतनाम आणि सिंगापूर हे देश आहेत आणि चीनचा या सर्वांशी समुद्री सीमांवरून वाद सुरू आहे.

चीन या देशांना धमकवण्यासाठी सातत्याने आपल्या नौदल सामर्थ्याचे प्रदर्शन घडवत असतो. चालू वर्षाच्या सुरुवातीलाच चीनच्या पीएलएने दक्षिणी थिएटर कमांडच्या अंतर्गत एक मोठा सैन्य सराव केला होता. या सरावात विविध प्रकारच्या युद्धनौका, हवाई ताफ्ते, क्षेपणास्त्रे, एअर डिफ्रेन्स सिस्टिम आणि विविध शस्त्रास्त्रांचा समावेश होता. चीनच्या या युद्धसरावाचा मुख्य उद्देश आपल्या युद्धसज्ञतेची चाचणी घेणे आणि शेजारील देशांवर दबाव टाकणे हा होता.

दक्षिण चीन समुद्रात प्रचंड तेल आणि वायू साठे असल्याचे अमेरिकेच्या ऊर्जा माहिती प्रशासनाने म्हटले आहे. त्यांच्या अंदाजानुसार, या समुद्रात १९० ट्रिलियन क्यूबिक फ्रूट नैसर्गिक वायू आणि ११ अब्ज बॅरल कच्चे तेल आहे. अमेरिकी भूगर्भीय सर्वेक्षणाच्या अहवालानुसार, इथे १६० ट्रिलियन क्यूबिक फ्रूट नैसर्गिक वायू आणि १२ अब्ज बॅरल तेल लपलेले असू शकते. चीनच्या अंदाजानुसार, हा साठा याहून अधिक मोठा आहे. त्यामुळे चीन इतर कोणत्याही देशाला हा साठा वापरण्याची संधी देऊ इच्छित नाही. १९४७ पासून चीनने दक्षिण चीन समुद्रावर वर्चस्व गाजवण्याचे प्रयत्न सुरू केले. त्याने प्रथम '११ डॅश लाइन' आखली आणि नंतर १९५२ मध्ये व्हिएतनामसोबतच्या करारानंतर तिला '९ डॅश लाइन' मध्ये रूपांतरित केले. १९५६ मध्ये दक्षिण चीन समुद्रातील समुद्री अन्वेषणाची सुरुवात झाली. तेव्हापासून, या क्षेत्रातील तेल आणि वायू संसाधनांच्या शोधासाठी विविध टप्प्यांत काम केले गेले आहे.

# महात्मा फुले यांची श्रेष्ठ प्रेरणा–समता–मानवता

महात्मा फुले हे केवळ चार्तुवर्ण्यावर–ब्राम्हण श्रेष्ठत्वावर एकूण विषमताधिष्ठीत हिंदू धर्मावर आघात करुन थांबले नाहीत. तो त्यांच्या बंडखोरीचा केवळ आवश्यक आणि प्राथमिक असा विघ्वंसक अविष्कार होता, पण त्याहूनही श्रेष्ठ अशी फुल्यांची प्रेरणा होती. ती म्हणजे संपूर्ण समतेची, बंधुत्वाची, मानवतेची, विश्वकुटुंबाची त्यामध्ये वर्ण, जात तर सोडाच पण देश, धर्म, वंश या मधिल भेदांना त्यांच्या वृथा अभिमानाला यकिंचितही वाव नव्हता. वंश, धर्म, देश, कृत्रिम मनुष्यनिर्मिती, भेदभाव आहेत. त्यामुळे मुठभर स्वार्थी लोकांचाच स्वार्थ साधतो, त्यासाठी ते सामान्य जनतेमध्ये नसते भेदभाव, विषमता, राग–द्वेष निर्माण करतात. त्यापासुन द्वेष नाही. वंश, धर्म, देश मुक्त नाही, म्हणुन या सर्वांचा विलय करुन त्याहून श्रेष्ठ अशा मानवतेची, समानतेची, स्वातंत्र्याची, विश्वकुटुंबाची प्राणप्रतिष्ठा केली पाहिजे, ही खरी फुल्यांची प्रेरणा होती, शिकवण होती.

एकविसाव्या शतकाकडे नजर लावून बसलेल्या भारतात शिक्षण तळागाळापर्यंत पोहचू शकलेलं नाही हे वस्तुस्थिती नाकारता येत नाही. आजही समाजात हक्कांची जाण आहे. पण कर्तव्याचा विसरच पडला आहे. आजही दीनदुबळे दलित अन्याय सोसतच आहेत. परहिता साठी अष्टाप्रहर राबणारा, झिजणारा शेतकरी, कामकरी, श्रमजीवी आजही दारिद्र्याचे आणि अन्यायाचे चटके अनुभवतच वाटचाल करत आहे. शहरे सोडली तर आजही खेडोपाडी, डोंगरी भागात छोटी छोटी मुलं कामाला जुपली जात असल्यानं शिक्षणाला वंचितच आहेत. शांतता वर्षातही शांतता औषधालाही नाही. उलट जिकडे तिकडे द्वेषाचे, विद्रोहाचे अशांत वातावरण खदखदत आहे. आजही साक्षरतेचे प्रमाण फारच कमी आहे. महात्मा फुल्यांनी अस्पृश्य मुलांसाठी शाळा काढली आणि ज्ञानांच दालन त्यांच्यासाठी खुले केले हे जरी खरे असले तरी विषमता आणि जातीभेद यांना आज देखील पूर्णपणे मुठमाती मिळू शकलेली नाही, ही वास्तविकता आहे.

शिक्षणाचा प्रसार जर तळागाळापर्यंत झाला तरच क्रांती होईल असं तर ''विद्येविना मती गेली, मतीविना निती गेली नीतीविना गती गेली गतीविना वित्त गेले आणि वित्तविना शुद्र खचले''. शंभर वर्षापूर्वीची हिच स्थिती आजही आहे. माणसाच्या समुद्रात आज माणुसकीच हरवली आहे. सामाजिक आणि आर्थिक विषमता याचं आजही पूर्णपणे उच्चाटन झालेले नाही. बंधुभाव फक्त ओठातच आहे.अशी स्थिती पाहिल्यावर महात्मा फुल्यांसारखी माणसं का बरं अस्वस्थ होणार नाहीत. आज जर महात्मा फुले आपल्यात असते तर त्यांनी आपल्या परखड विचारांच्या पवित्र्यांनी द्वेष, भ्रष्टाचार, अन्याय, दरिद्रय यांचा अंध:कार दूर करायचा नक्कीच प्रयत्न केला असता. आणि मग या विषयावर बोलायचा कदाचित प्रसंगही आला नसता.

हिंदू समाजातल्या मतलबी रुढींचा त्यांना तिरस्कार वाटू लागला. ज्योतिबांने शाळेतला अभ्यासक्रम पूर्ण करतांनाच १८४७ पर्यंत ज्योतिबा बुध्दिने चांगले प्रौढ झाले होते. त्यांनी समाजाचे बारकाईने निरीक्षण केले. त्यातून त्यांच्या असे लक्षात आले की, आपला हिंदु समाज जातीभेदाने आणि विशिष्ट वर्गाच्या गुलामगिरीत राहिल्याने प्रतिगामी बनला आहे. स्त्रियां आणि शुद्रांची कुचंबना होत आहे. हे सर्व स्त्रियां आणि बहुजन समाज शिक्षणापासुन दुर राहिल्यामुळे घडत आहे, असे त्यांच्या निदर्शनाला आले. त्यावरुन त्यांनी भावी जीवनातील कार्याची दिशा ठरविली. ते सरकारी नोकरीच्या मागे न लागता समाजकार्य करायचे ठरवून कामाला लागले. सामाजिक गुलामगीरी दूर करणे आणि सर्वांना शिक्षणाची दारे खुली करणे त्यासाठी प्रयत्नशील राहणे हे त्यांच्या जीवनाचे ध्येय ठरले.

हे कार्य तत्कालीन रुढीप्रिय समाजाला रुचले नाही. मुलींची शाळा काढण्यासाठी पूर्व तयारी म्हणून त्यांनी आपल्या पत्नीला प्रथम शिक्षण दिले. सावित्रीबाई नी ही आपल्या पतीच्या जीवन कार्याला मनापासून सहाय्य केले. १८४८ मध्ये पहिली १८५१ मध्ये दुसरी आणि १८५२ मध्ये तिसरी मुलींची शाळा काढली. या शाळा व्यवस्थित चालू लागल्या. मेजर कँडी यांनी सरकारतर्फे ७५ रुपये अनुदान मंजुर केले. फुले यांच्या या महान सामाजिक कार्याचा गौरव म्हणुन त्यांचा सत्कार ही करण्यात आला. या नंतर ज्योतिबांनी सामाजिक सुधारणेकडे विशेष लक्ष द्यायचे ठरविले. व्यक्ति स्वातंत्र्य, समता आणि बुध्दि प्रामाण्य यासाठी ते झगडू लागले. सतीची प्रथा, विधवा पूर्नविवाह, भृणहत्या (लहान मुलांची हत्या) या समाज विघातक गोष्टींना त्यांनी विरोध केला. केवळ शाब्दिक विरोध न करता त्यांनी पुढाकार घेवून ''बालहत्या प्रतिबंधगृह'' ही संस्था सुरु केली. समाजस्पृश्य–अस्पृश्य असा भेदाभेद पाळणाऱ्याचा रोष पत्करुन त्यांनी आपल्या घरी असलेला पाण्याच्या हौद सर्वांना म्हणजे अस्पृश्यांनाही खुला केला.




शिक्षण हेच समाज परिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे, हे लक्षात येताच अस्पृश्यासाठी, स्त्रियांसाठी त्यांनी शाळा उघडल्या, अनाथाश्रम काढले, वृत्तपत्र काढले. धर्म जन्माने न मिळता माणसाच्या स्वत:च्या बुध्दीने स्विकारला पाहिजे. शेतकयांच्या व्यथा इंग्रज प्रशासनाच्या कानी पोहोचविल्या.शेतकरी हा समाजाचा कणा आहे. पोशिंदा अन्नदाता आहे, असे मत मांडले आणि जगजागृती केली. त्यांच्या साठाव्या वर्षी जनतेने मुंबईस त्यांचा नेत्रदिपक सत्कार करुन त्यांना ''महात्मा'' ही पदवी बहाल केली. सामाजिक समता, आर्थिक न्याय व शोषणमुक्ती यासाठी ज्योतिबाने अखेरच्या क्षणापर्यंत प्रयत्न केले. त्यांच्या पुरोगामी विचारांना कृतीची जोड मिळाली जणू ती मानवतेच्या कणवतेची बैठक होती. ज्योतिबांच्या कृतीमुळे, कर्तृत्वामुळे या समाजाची नवी पहाट उदयास आली. सावित्रीमाई भारतातील आद्यकांतीकारी थोर स्त्री होती. ज्योतिबांना सावित्रीमाईची सक्रीय साथ लाभली. सामाजिक सुधारणेची सुरुवात आपल्या घरापासुन करणारे ज्योतिबाफुलें सारखे समाजसुधारक युगात होणे अशक्य आहे. सुधारकाग्रणी, संपूर्ण महाराष्टाचे भुषण, सुधारकांचे सुधारक त्यांच्या विचारांनी आणि धाडसी वृत्तीने कृत्तीने समाजाला जागे केले. काळाच्या खूप पुढे जाण्याचे सामर्थ्य त्यांच्यात होते. हीन–दीन–जीवांना एकोणिसाव्या शतकात त्यांनी आपल्या विशिष्ट ध्येयासाठी आपले संपूर्ण जीवन समर्पित केले.

मानवी सामाजिक सुधारणेचे अवलोकन केले, परिस्थितीचे अवलोकन केले आणि प्रकाशमय मानवी स्वातंत्र्याच्या दिव्य युगाकडे सामाजिक माणसाच्या नवयुगाची ग्वाही देणारा आधुनिक भारतातील पहिला समाजक्रांतीकारक क्रांतिबा ज्योतिराव फुले नावाचा धगधगता लाव्हा तयार झाला. कारण देशात जातीभेदाची सुनामी ऊफाळुन आली होती. त्यामुळे कोणी शुद्र नदीकाठावर वस्त्रधुत असता तेथे एखादा भट आला तर शुद्रास आपली सर्व वस्त्रे गोळा करुन भटाच्या अंगावर शिंतोडा येण्याचा संभव नाही, अशास्थळीजाऊन वस्त्रे धुवावी लागत. भटाच्या अंगावर नकळत पाण्याचा शिंतोडा उडालाच तर भटाने रागाने अग्नीसारखे तप्त होऊन आपल्या जवळचे जड भांडे शुद्रांच्या डोक्यावर मारावे, ब्राम्हणावर तर सावली सुध्दा पडू नये याची पूर्णपणे खबरदारी शुद्राने वस्तीतून वाट असेल त्या वाटेवरुन जाण्यास सुध्दा धोका पत्करु नये असा कायदा, अशा कायद्याचे राज्य होते, त्यामुळे राज्यात अनेक छळवाद होते. स्त्रियांना तर त्या रुढीने बंदीस्तच करुन ठेवले होते. पुरुषप्रधान व्यवस्थांच्या रणधुमाळी विषयी फुले म्हणतात की, स्त्री ही जात अबला असल्यामुळे तिच्यापूढे लोभी व धाडसी पुरुषांनी स्वत:चेच म्हणणे खरे केले आणि स्त्रीयांना मानवी हक्क समजू नयेत म्हणून पूर्ण अंधारात ठेवले. ज्योतिरावांना सावित्रीमाईंची भक्कम साथ मिळाल्यानंतर त्यांनी विचार केला की, हे आता शुद्र अतिशुद्रांचा छळवाद बदलला पाहिजे. त्यावेळे पासून स्त्री चळवळीचा जन्म झाला.

महात्मा फुले आज जरी आमच्यात नाहीत परंतु कर्तृत्वाच्या रुपाने ते निश्चितच आमच्यांत आहेत. कारण जे दुस–यांसाठी मरतात, तेच खया अर्थानं जगतात आणि आपल्या कार्यकर्तृत्वाच्या रुपानं अमर असतात, म्हणजेच आपल्यातच असतात. आता हे जर खंर असेल तर महात्मा फुले देखील कार्यरुपानं आपल्यातच आहेत, असं नाही का तुम्हाला वाटत? मला तर वाटतं, या विषयाच्या निमित्तानं ज्ञानज्योतीचं चरित्र आणि चारित्र्याचा आचार, विचार आणि उच्चाराचा जवळून परिचय व्हावा आणि आपण त्यांचे कार्य जोमानं, जिद्दीनं आणि निष्ठेनं करावं असंच बहुधा बहुतेकांना अपेक्षित असावं लौकिकर्थानं आज जरी महात्मा फुले आपल्यात नसले, तरी त्यांचे अलौकिक कार्य कलेकलेनं वाढतच राहणार आहे.आणि त्यांचे अस्तित्व तर नेहमीचे आपल्यात राहणार आहे.

ज्ञानज्योत प्रज्वलित केलेल्या ज्योतिबांना सामाजिक समता, मानवता, विवेक, विनय आणि नम्रता यावर प्रकाश टाकुन राष्ट्राला स्वायत्ततेच ध्येय गाठण्यासाठी गतिमान बनवायचं होतं. समाजजागरणाचा वसा घेतलेले स्त्रीशिक्षण आणि स्त्रीशक्ति जागृतीचा मंत्र निनादात ठेवणारे, आणि अस्पृश्यांबद्दल कणव आणि बंधुता बाळगणारे ज्योतिबा आज असते तर ! खरंच काय बरं वाटलं असतं त्यांना ? आजही समाजात समता आणि बंधुता पूर्णपणे उतरु शकली नाही हे पाहून ते नक्कीच अस्वस्थ झाले असते. जयंती आणि पुण्यतिथी या दोन दिवशी आपली आठवण ठेवणारे, याच दिवशी आपल्या पुतळयाला हार घालून खोटी पूजा करुन अवडंबर माजवणारे तथाकथित कार्यकर्ते आणि पुढारी पाहून त्यांना नक्कीच चीड आली असती.

फुले आणि आंबेडकरांचे हे अतूट नाते ध्यानात घेतले की, दोघांच्याही वैचारिक त्याचप्रमाणे व्याव्हारिक जीवनावरही नवाच प्रकाश पडतो. दोघांचे चरित्र आणि कतृत्व शेजारी शेजारी ठेवले. तर दोन्ही समजायला नि:संशय मदत होते. ६३ वर्षे चंदनासारखे झिजले. प्रवास केला, व्याख्याने दिली, लेख लिहिले. स्वातंत्र्य, समता, लोकशाही, विज्ञान, इहवाद या आधुनिक मुल्यांवर भर देऊन सामाजिक क्रांतीची प्रेरणा दिली. डॉ. आंबेडकरांनी त्यांना गुरु मानले. सहज सोप्या भाषेत नेमकी स्पष्टता आणणे त्यांना जमत असे. विचारांना कृतिशीलतेची जोड दिली. जैसे बोलावे, तैसे चालावे, मग महंतलीला स्वभावे, अंगी बाणे या समर्थवचनाची सार्थकता सिध्द करणारा हा महात्मा सर्व सुखाचे आगर नीतितत्त्वांचे माहेर अशा हया क्रांतीसूर्य महात्मा फुले यांच्या जयंती निमित्त हार्दिक शुभेच्छा !

********

प्रविण बागडे
नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९

# दिल्लीमध्ये दररोज होतो सरासरी २० बालकांचा मृत्यू! समोर आले बालकांच्या मृत्यूचे धक्कादायक कारणं

दरवर्षी जगभरात सगळीकडे ७ एप्रिलला जागतिक आरोग्य दिवस साजरा केला जातो.जगभरातील सगळ्यांचा निरोगी आरोग्याचे महत्व पटवून देण्यासाठी आणि आरोग्य किती महत्वाचे हे पटवून देण्यासाठी जागतिक आरोग्य दिवस साजरा केला जातो. यंदाच्या वर्षी आपला ग्रह, आपले आरोग्य ही थीम ठरवण्यात आले आहे. चुकीचा जीवनशैलीचा परिणाम आरोग्यावर लगेच दिसून येतो. यामुळे मधुमेह, कॅन्सर, हार्ट अटॅक, उच्च रक्तदाब, फुफ्फुसांसंबधित आजार, कोलेस्ट्रॉल इत्यादी अनेक गंभीर समस्या उद्भवू लागल्या आहेत. वाढत्या आजारांबाबत जनजागृती करण्यासाठी आणि आरोग्याचे महत्व लोकांना पटवून देण्यासाठी सगळीकडे जागतिक आरोग्य दिवस साजरा केला जातो. राजधानी दिल्लीमध्ये नवजात बालकांच्या मृत्यूचे प्रमाण वाढू लागल्यामुळे चिंता व्यक्त केली जात आहे.

जन्माला आल्यानंतर वर्षभराच्या आतमध्ये जवळपास एका दिवसाला २० पेक्षा जास्त बालकांचा मृत्यू होतो. बालकांच्या मृत्यूची नोंद देखील करण्यात आली आहे. गर्भधारणेदरम्यान अयोग्य विकास, कुपोषण, न्यूमोनिया आणि सेप्टिसीमिया इत्यादी आजारांची लागण बालकांना होण्याची शक्यता असते. आईच्या गर्भात बाळाचा योग्य विकास न झाल्यामुळे बालकांच्या मृत्यूचे प्रमाण वाढले आहे. या आकडेवारीमध्ये दिवसेंदिवस वाढ होत चालली आहे, मात्र अजूनही गरजूंपर्यंत कोणत्याही सुविधा पुरवण्यात आलेल्या नाहीत.

आईच्या गर्भात बाळाचा योग्य विकास न होणे, रुग्णालयातील अपुऱ्या सोयीसुविधा इत्यादी अनेक कारणांमुळे बाळाच्या आरोग्याला धोका पोहचण्याची शक्यता असते. त्यामुळे नवजात बालकांचे प्राण वाचवण्यासाठी आरोग्यसुविधा पुरवणे आवश्यक आहे. बाळाच्या निरोगी आरोग्यासाठी गर्भाशयतच बाळाची काळजी घेणे आवश्यक आहे. बालकांचा मृत्यूदर कमी करण्यासाठी यंदाच्या वर्षीच्या थीममध्ये जास्त भर दिला जाईल.

गर्भवती मातांच्या प्रसूतीमध्ये ९५.५८ टक्क्यांपर्यंत वाढ झाल्यामुळे माता मृत्युदर ०.५० पेक्षा कमी झाला आहे.पण २०२३ मध्ये १४२ गर्भवती महिलांचा मृत्यू झाला होता. त्यामुळे दिल्लीच्या आरोग्य यंत्रणेवर नवजात बालक आणि अर्भक मृत्यू दर कमी करण्यासाठी अनेक प्रयत्न केले जात आहेत. बालकांच्या आकडेवारीचा दर वाढल्यामुळे चिंता व्यक्त केली जात आहे. मागील चार वर्षांमध्ये बालकांच्या मृत्यूचे प्रमाण मोठ्या संख्येने वाढले आहे.

वाढत्या उष्णतेपासून शरीराचे रक्षण करण्यासाठी रोजच्या आहारात करा 'या' फळांच्या रसाचे सेवन, शरीर राहील थंड

अमेरिकेमध्ये गर्भवतीच्या मातांच्या प्रसूतीमध्ये वाढ झाली आहे. दिल्लीसह संपूर्ण देशात माता आणि बालमृत्यूचे प्रमाण दीड ते दोन दशकांपूर्वीच्या तुलनेत कमी झाले आहे, पण यादरात काहीशी वाढ होताना दिसून आली आहे. त्यामुळे यामध्ये सुधारून करून बालकांचे जीव वाचवण्यावर भर देणे जास्त गरजेचे आहे.अमेरिकेमध्ये १००० बालकांच्या जन्म झाल्यानंतर ५ किंवा ६ बालकांच्या मृत्यूची नोंद होते. या तुलनेत अमेरिकेमध्ये बालकांचा मृत्यूदर जास्त आहे.

# किती तास झोपल्याने कोलेस्ट्रॉल अन् मधुमेहाचा धोका झपाट्याने होईल कमी? वाचा संशोधकांचा सल्ला

लवकर नीजे, लवकर उठे, त्यासी आरोग्य–धनसंपदा लाभे, अशी आपल्याकडे एक म्हण आहे. म्हणजेच जे लोक रात्री लवकर झोपतात व सकाळी लवकर उठतात, त्यांना चांगले आरोग्य आणि संपत्ती मिळते. झोप तुमच्या दैनंदिन दिनक्रमाचा महत्त्वाचा भाग आहे. योग्य वेळी पुरेशी झोप मिळणे अन्न आणि पाण्याइतकीच जगण्यासाठी आवश्यक आहे. आपल्या आरोग्यासाठी झोप किती महत्त्वाची आहे हे सगळ्यांनाच माहीत आहे. पण, जर तुम्हाला कोलेस्ट्रॉल आणि मधुमेह नियंत्रित ठेवायचं असेल तर तुम्हाला किती तासाची झोप घ्यायला हवी, माहिती आहे का? याविषयीचे वृत्त द इंडियन एक्स्प्रेसने दिले आहे, त्यासंबंधी सविस्तर माहिती जाणून घेऊ.



खरंतर कामाचे तास, वाढत्या ताणतणावाची पातळी आणि अस्वास्थ्यकर जीवनशैलीमुळे झोपेच्या अनियमित पद्धती उद्भवू शकतात. यामुळे केवळ तुमच्या दैनंदिन दिनचर्येतच व्यत्यय येतो असे नाही, तर तुमच्या आरोग्यावरही परिणाम होऊ शकतो; ज्यामुळे कोलेस्ट्रॉल आणि मधुमेहसारख्या जीवनशैलीच्या परिस्थिती उद्भवू शकतात. झोपेच्या कमतरतेमुळे उच्च कोलेस्ट्रॉल आणि रक्तदाब वाढू शकतो.

झोप आपल्या शरीराला आणि मनाला ताजेतवाने करण्यास मदत करते. झोपेच्या वेळी मेलाटोनिन नावाचे संप्रेरक शरीराला आराम देते, ज्यामुळे रक्तदाब आणि हृदयाचे ठोके कमी होतात. निद्रानाशामुळे तुमचे शरीर असामान्यपणे कार्य करू शकते. पुढील दिवशी तुमच्या मानसिक आणि शारीरिक क्षमतेवर त्याचा परिणाम होतो. हे तुमच्या मेंदूला थकवते, ज्यामुळे शरीराच्या नैसर्गिक कार्यावर परिणाम होतो.

२००९ च्या झोपेची समस्या नावाच्या एका अभ्यासात असे आढळून आले की, सहा तासांपेक्षा कमी झोपलेल्या पुरुषांमध्ये एलडीएल कोलेस्ट्रॉल जास्त होते. याव्यतिरिक्त, जवळजवळ समान प्रमाणात झोपलेल्या महिलांमध्ये कोलेस्ट्रॉलची पातळी कमी होते. आता या अभ्यासावरून हे स्पष्ट होते की, झोपेचा पुरुष आणि महिलांवर वेगवेगळ्या प्रकारे परिणाम होतो.

लठ्ठ लोकांमध्ये कोलेस्ट्रॉलचे प्रमाण जास्त असते यात शंका नाही. तसेच २०२० मध्ये, इन्स्टिट्यूट ऑफ मिलिटरी कॉग्निटिव्ह अँड ब्रेन सायन्सेस, अकादमी ऑफ मिलिटरी मेडिकल सायन्स, बीजिंग यांच्या संशोधनातून असे दिसून आले की, झोपेच्या कमतरतेमुळे सीरम कोलेस्ट्रॉलची पातळी वाढते आणि यकृतामध्ये कोलेस्ट्रॉलचे प्रमाण वाढते. सेंटर्स फॉर डिसीज कंट्रोल अँड प्रिव्हेन्शन च्या मते, झोपेच्या अनियमित पद्धतीमुळे शरीराची इन्सुलिन प्रतिरोधक क्षमता वाढू शकते. डायबिटीज केअरमधील २००९ च्या अहवालात असे आढळून आले की, वारंवार निद्रानाश असलेल्या लोकांना टाइप २ मधुमेहाचा धोका वाढतो. अमेरिकन अकादमी ऑफ स्लीप मेडिसिन आणि स्लीप रिसर्च सोसायटीने शिफारस केली आहे की, प्रौढांनी दररोज किमान सात ते आठ तास झोपावे. रात्री उशिरापर्यंत जागे राहणे म्हणजे अधिक फोन, टिव्ही पाहणे आणि खाणे, यामुळे बर्याचदा कार्ब आणि साखरेचे प्रमाण जास्त असलेले जंक फूड खाल्ले जातात. हे सर्व टाइप २ मधुमेहाचा धोका आणि लठ्ठपणा वाढवते.

# च्युइंगम चघळल्याने तुमच्या मेंदूवर होतो गंभीर परिणाम? संशोधनातून समोर आली धक्कादायक माहिती

अनेकांना च्युइंगम चघळण्याची सवय असते. कॉलेजमधील विद्यार्थ्यांपासून ते कॉर्पोरेट ऑफिसमध्ये काम करणाऱ्या अनेकांमध्ये ही सवय पाहायला मिळते. यामुळे तोंडातील दुर्गंधी कमी होत ताजा श्वास घेता येतो तसेच एकाग्रता वाढते. पण, लॉस एंजेलिसमधील च्या कॅलिफोर्निया विद्यापीठाच्या एका संशोधनातून असे दिसून आले की, चघळत असलेल्या प्रत्येक च्युइंगमच्या तुकड्यातून नकळत तुम्ही हजारो लहान प्लास्टिकचे तुकडे गिळत आहात. हे मायक्रोप्लास्टिक्स शरीरात जाऊन तुमच्या मज्जासंस्थेवर परिणाम करू शकतात.



पूर्वी झाडाच्या रसापासून तयार केले जाणारे मूळ च्युइंगम मिळायचे, पण आता मिळणारे च्युइंगम हे अनेकदा प्लास्टिकचे आहेत. यात आजकाल बहुतेक च्युइंग गममध्ये पॉलिथिलीन आणि पॉलीव्हिनिल एसीटेटसारखे सिंथेटिक पॉलिमर असते, जे बहुतेकदा प्लास्टिकच्या पिशव्या आणि गममध्ये वापरले जाते. तुम्ही च्युंइगम चघळता तेव्हा घर्षण आणि लाळेमुळे त्यात मिसळलेल्या फ्लेवर्सचे विघटन होते, ज्यानंतर त्यातील हजारो लहान प्लास्टिकचे कण तुमच्या तोंडात जातात. हे कण लाळेत मिसळतात आणि शरीराद्वारे गिळले जातात किंवा शोषले जातात, असे गुरुग्राम येथील आर्टेमिस हॉस्पिटलमधील न्यूरोसर्जरी आणि सायबरनाइफचे संचालक डॉ. आदित्य गुप्ता म्हणाले.

सध्या च्युइंगममधील प्लास्टिक कणांवर फारसे संशोधन झालेले नसले तरी मायक्रोप्लास्टिकच्या संपर्कात आल्यानंतर शरीरावर होणाऱ्या परिणामांबाबत झालेल्या अभ्यासातून असे दिसून आले की, मायक्रोप्लास्टिक आपल्या शरीरात गेल्यास मेंदूच्या आरोग्यास धोका निर्माण होऊ शकतो. मायक्रोप्लास्टिक आतड्यातील अस्तर तसेच काहीवेळा रक्तवाहिन्या आणि मेंदूतील अवयवांमध्ये अडथळा निर्माण करते. तसेच मज्जासंस्थेवर त्याचा गंभीर परिणाम होण्याचीदेखील शक्यता असते.

# तमन्ना भाटियाप्रमाणे तुम्हीही दिवसाची सुरुवात एक कप कॉफीने करता? आजच थांबवा; वाचा, सकाळची कॉफी शरीरावर कसा परिणाम करते?

तमन्ना भाटिया तिच्या नवनवीन चित्रपटांमुळे आणि वैयक्तिक आयुष्यामुळे सतत चर्चेत असते. ती तिच्या फिटनेससाठीसुद्धा ओळखली जाते. एका मुलाखतीत तमन्ना सांगते की, तिला सकाळची कॉफी अतिशय प्रिय आहे आणि ती सकाळी कॉफी पिणे सोडू शकत नाही. तमन्ना सांगते, मला सकाळी उठल्यानंतर एक कप कॉफी पाहिजे असते. माझ्या आहारतज्ज्ञ यामुळे खूश नसतील, पण मी कॉफी पिते, ते माझं आवडतं ड्रिंक आहे.

ती पुढे सांगते, हा माझा वेळ असतो, जेव्हा मी कॉफी पिते तेव्हा संपूर्ण दिवसाचे नियोजन करते. तमन्नाने फॅशन इन्फ्लुन्सर मासूम मीनावालाच्या पॉडकास्टवर याविषयी सांगितले आहे.

तमन्नाने कबुल केले की सकाळी कॉफी पिणे आरोग्यासाठी चांगले नाही. आज आपण सकाळची कॉफी शरीरावर कसा परिणाम करते, ते जाणून घेऊ या.



मुंबईतील झायनोव्हा शाल्बी हॉस्पिटलचे आहारतज्ज्ञ जिनल पटेल सांगतात, काही लोक दररोज सकाळी उठून सर्वात आधी कॉफी पितात, यामुळे त्यांना दिवसभर उत्साही वाटते आणि ते संपूर्ण दिवसासाठी तयार होतात. उपाशी पोटी कॉफी प्यायल्याने आतड्यांच्या आरोग्यावर दीर्घकाळासाठी परिणाम दिसू शकतो. कॉफीमध्ये ॲसिड असते आणि उपाशी पोटी कॉफी प्यायल्याने आतड्यांना त्रास होऊ शकतो, त्यामुळे ॲसिड रिफ्लक्स आणि छातीत जळजळ वाटू शकते. काही लोकांना ॲसिडिटी होऊ शकते, कारण यामुळे पोटात ॲसिड तयार होते. छातीत जळजळ वाटणे, ढेकर येणे, अपचन होणे इत्यादी समस्या जाणवतात, असे पटेल पुढे सांगतात.

गुरुग्राम येथील पारस हेल्थच्या आहारतज्ज्ञ दृश्या अले सांगतात, कोणत्याही प्रकारच्या अन्नाचे सेवन केल्याशिवाय कॉफी प्यायल्याने रक्तातील साखरेचे प्रमाण वाढू शकते आणि त्यानंतर रक्तातील साखरेची (ग्लुकोज) पातळी अचानक कमी होऊ शकते, यामुळे लोकांना थकवा जाणवू शकतो. उपाशी पोटी कॉफी प्यायल्याने काही लोकांच्या शरीरात कॉर्टिसोलची पातळीदेखील वाढू शकते, ज्यामुळे तणाव आणि ऊर्जेची पातळी बिघडू शकते, असे अले सांगतात. हार्दिक पांड्याबरोबरच्या घटस्फोटानंतर लोक नताशाला जज करायचे; वाचा, घटस्फोटानंतर सामाजिक दृष्टिकोनाचा व्यक्तीवर कसा परिणाम होतो?

# मुंबई पोलीसाने चाकूरच्या रोहिण्यात सुरु केला ड्रग्ज कारखाना?

चाकूर: तालुक्यातील रोहिणा हे गाव अंबिका तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे. या गावात वर्ग १ पासुन चतुर्थ श्रेणी अधिकारी कर्मचारी मोठ्या प्रमाणात आहे. जवळपास ८४ पोलीस कर्मचारी याच गावाने पोलीस खात्याला दिले आहे. महसूल गुप्तचर संचालनालयाच्या पथक मंगळवारी दुपारी रोहिना गावातील एका शेतात दाखल झाले आणि रोहिण्याचे ड्रग्स कनेक्शन उघडकिस आले. मुंबईहून महसूल गुप्तचर संचालनालयाचे पथक आले त्यांनी रोहिण्याच्या गाढव माळातील त्या शेडचा तपासही लावला. शेडमध्ये मुंबईहून कच्चामाल आणून ड्रग्ज र्मिती केली जात होती. ईरटीगा कंपनीच्या एम एच १४ एल बी १८९२ गाडीतून कर्मचारी आरोपीस जात होते. गाडी लातूर रोड नजिक महामार्गावर ३६१ वर आली असता आरोपी आहाद मेमनने अधिकाऱ्यांना व ड्रायव्हरला धक्का बुकी करत स्टेअरींग फिरवली आणि गाडी हॉटेल चे फलक तोडून हॉटेल बाहेरील दुचाकीस धडक देत गिट्टीच्या ढिगाऱ्याला अडली अपघात झाला. सुदैवाने जीवितहानी झाली नाही. कर्मचाऱ्यांना व आरोपीला किरकोळ मार लागला. वृंदा सिन्हा यांच्या तक्रारीवरून चाकूर पोलीस ठाण्यात कमल ३५३ नुसार आरोपी आहाद शफिक मेमन याच्या विरोध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अपघात घडला आणि मुंबई ड्रग्ज प्रकरणातील आरोपीच्या शोधात आलेल्या महसूल गुप्तचर संचालनालयाच्या पथकाच्या कारवाईची माहिती मिळाली. मुंबई ते चाकूर ड्रग्ज कनेक्शन अंबिका देवीच्या तीर्थक्षेत्रांना प्रसिद्ध असणाऱ्या रोहिना गावाला एक सांस्कृतिक वारसा आहे. याचबरोबर या गावातून जवळपास ८४ पोलीस जवान पोलीस खात्यात नोकरी करता. मीरा-भाईंदर पोलीस ठाण्यात कार्यरत असणाऱ्या एका कर्मचाऱ्याला वाम मार्गाने पैसा कमावण्याची लालसा लागली.





ड्रग्ज प्रकरणात अटकेत असणाऱ्या त्या पोलीस कर्मचाऱ्याच्या सहवासातील इतर आरोपींच्या शोधात पथक चाकूर तालुक्यात आले. गाढव माळावरील त्या उजाड रानात पोलिसांनी एका शेड वर छापा मारला आणि आरोपीसह १७ कोटी रुपयांचे मेफेड्रॉन जप्त करण्यात आले आहे. ड्रग्ज निर्मितीचा कारखाना महसूल गुप्तचर संचालनालयाच्या पथकाने शोधून काढून उद्ध्वस्त केला. याप्रकरणी ज्या शेडमध्ये ड्रग्ज निर्मिती केली जात होती त्या शेतमालकालाही ताब्यात घेण्यात आले आहे. मराठवाड्यातील तुळजापूर मंदिरातील काही पुजारी अशाच एका ड्रग्ज प्रकरणात आरोपी सिद्ध झाल्यानंतर आता मीरा-भाईंदर येथील पोलीस कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून त्याच्याच गावात ड्रग्ज निर्मितीचा कारखानाच उभा केल्याचे झाले चर्चिले जात आहे. याबाबत पोलीस उपविभागीय अधिकारी बी चंद्रकांत रेड्डी यांच्याशी संवाद साधला असता अधिक माहिती प्राप्त होऊ शकली नाही. तीर्थक्षेत्र आणि पोलिसांचं गाव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गावातील एका पोलिसानेच मुंबई पोलिसांची अब्रू तर चव्हाट्यावर आणलीच पण गावाची ही अब्रू घालवली असं गावकऱ्यातून बोलले जात आहे. या ठिकाणी किती दिवसापासून हा ड्रग्ज निर्मितीचा गोरख धंदा चालू होता. कोठे कोठे सप्लाय केला जात होता. याबाबत गावकऱ्यांना मात्र कसलीही कुणकुण नव्हती. महसूल गुप्तचर संचालनालयाच्या पथकाने मात्र कारवाई करून सगळ्यांचीच डोळे उघडले आहेत. चाकूर तालुक्यातील रोहिण्याचे कनेक्शन आता थेट मुंबईतील ड्रग्ज माफीयासी जोडले गेले आहे. चांगल्या पगाराची नोकरी असतानाही अधिकच्या पैशाचा हव्यास झाला. रोहिण्याच्या मुंबई पोलीसाने ड्रग्ज कारखानाचा उघडला. या प्रकरणात स्थानिकचे कोण कोण सहभागी आहेत का? याचे मात्र जोरदार चर्चा सुरू आहे.

## निलंगा तालुक्यातील धानोरा गावाला बस सेवा सुरू करण्याची मागणी..

निलंगा :- निलंगा तालुक्याच्या दक्षिण भागात असलेल्या मौजे धानोरा गावी एसटी बस सेवा चालू करावी, अशी मागणी धानोरा ग्राम पंचायतीच्या वतीने व ग्रामस्थांनी केली आहे. धानोरा या गावाला व या मार्गावर प्रवासी वाहतुकीचे दुसरे कोणतेही साधन नाही. त्यामुळे शालेय विद्यार्थी, अबाल वृद्ध व महिलांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. या मार्गावर बससेवा नसल्यामुळे या भागातील प्रवाशांना खासगी वाहनाने प्रवास करावा लागत आहे. यातून आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. सकाळच्या वेळी शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना ,प्रवाशांसाठी ही बस सेवा महत्त्वाची आहे. त्यामुळे या मार्गावरील बससेवा चालू ठेवावी, अशी मागणी ग्राम पंचायत कार्यालयाने ठराव घेऊन केली आहे. या मार्गावरून एसटीला चांगले उत्पन्न मिळनार आहे. मुख्य मार्गावर १५ मिनिटाला सेवा पुरविणाऱ्या एसटी बसने दिवसभरातून एकदा तरी या भागातून चक्कर मारावी, अशी अपेक्षा वृद्ध, विद्यार्थी आणि महिलांमधून केली जात आहे. याबाबतचे निवेदन ग्रामपंचायतीच्या वतीने निलंगा एसटी आगाराकडे दिले आहे. निवेदनावर सरपंच,ग्रामसेवक यांच्यासह ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत..

## लातूर शहरातील २८ कॉफी शॉप मालकांवर कारवाई. लातूर पोलिसाची विशेष मोहीम.

लातूर :- लातूर शहरातील २८ कॉफी शॉप मालकांवर कारवाई. लातूर पोलिसाची विशेष मोहीम. याबाबत अधिक माहिती अशी की, दिनांक ०९ एप्रिल २०२५ रोजी लातूर पोलिसांकडून विशेष मोहीम राबविण्यात आली. कॉफी शॉप मालकांनी त्यांचे शॉपमध्ये बंदिस्त कम्पार्टमेंट तयार करीत असल्याचे निदर्शनास आल्याने पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांचे मार्गदर्शनात लातूर शहर उपविभागीय पोलीस अधिकारी रणजीत सावंत यांचे नेतृत्वात लातूर शहरातील चार पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी व त्यांचे पथकाने लातूर शहरातील विविध कॉफी शॉपवर अचानक भेट देऊन नियमांचे उल्लंघन करणाऱ्यावर कारवाई केली आहे. कारवाईत २८ कॉफी शॉप ना भेटी देऊन त्यातील ३ कॉफी शॉप मधील बंदिस्त कंपार्टमेंट त्यांचे चालका मार्फत तोडण्यात आले. तसेच १० कॉपी चालक धारकांना भारतीय न्याय सुरक्षा संहिता २०२३ कलम १६८ प्रमाणे नोटीस बजाविण्यात आली आहे. ज्या आस्थापनाधारकांनी नियमांचे उल्लंघन केले आहे त्यांचे परवाने रद्द करण्यासाठी पोलिसांकडून कारवाई करण्यात येत आहे.

कॉफी शॉप धारकांसाठी नियमावली

काही कॉफी शॉप धारक हे बेकायदेशीरपणे कॉफी शॉप चालवीत असल्याचे निदर्शनास आल्याने पोलीस अधीक्षक श्री सोमय मुंडे यांनी सदरची बाब जिल्हाधिकारी लातूर यांचे निदर्शनास आणून त्यांनी दिनांक २० जून २०२३ रोजी पासून लातूर जिल्ह्यात कॉफी शॉप/हॉटेल धारकांसाठी नियमावली जारी करण्यात आली आहे.

काय आहे कॉफी शॉप/ हॉटेल धारकांसाठी नियमावली

१. सीसीटीव्ही फुटेज असणे बंधनकारक आहे.
२. सर्व दरवाजे पारदर्श काचेचे असावेत.
३. बैठक व्यवस्था सर्व ठिकाणी स्पष्ट दिसेल अशी असावी.
४. अंतर्गत बंदिस्त कंपार्टमेंट असू नयेत.
५. सक्षम प्राधिकार्यासाठी भेट पुस्तिका ठेवलेली असावी.
६. ध्वनी क्षेपक नियमांचे पालन करण्यात यावे.
७. धूम्रपान करण्यास सक्त मनाई असावी.
८. शासनाने दिलेल्या वेळेतच चालू ठेवता येतील.

वरील नियमांचे पालन न केल्यास कॉफी शॉप व हॉटेल धारकांनी विरुद्ध कायदेशीर करण्यात येते.

## लातूर येथील शाहू कॉलेज येथे ए.ई.ए.स्क्रिनिंग टेस्ट मध्ये केजच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश..!



केज/प्रतिनिधी केज शहरातील संचालक प्रा.डॉ.विठ्ठल आवाड सरांचे आवाड एज्युकेशनल अकॅडमी ही गेल्या दशकापासून केज शहरातील शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करत आहे. राजर्षी शाहू ज्युनियर कॉलेज लातूर मार्फत प्रति वर्षी इयत्ता अकरावी च्या प्रवेशासाठी दहावी झालेल्या विद्यार्थ्यांची स्क्रिनिंग टेस्ट घेतली जाते. यामध्ये दरवर्षी हजारो विद्यार्थी परीक्षा देत असतात व त्यातून एआयआयएमएस व आयआयटी अशा प्रत्येकी २८० व १२० विद्यार्थ्यांच्या दोन तुकड्या निवडल्या जातात. यावर्षीच्या टेस्ट मध्ये आवाड एज्युकेशनल अकॅडमी च्या दहा विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. प्रथमेश चाटे,अनम खतीब,जोया सय्यद,कृष्णा जाधव,राजवीर मुंडे,सुरज मुंडे,स्वराली वडगावकर,आशा चाळक,चैतन्य तांदळे,वैष्णवी देशमुख यांची निवड झाली आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी बोलत असताना म्हटले की, हे यश प्रा.डॉ. विठ्ठलआवाड सरांच्या मार्गदर्शनामुळेच प्राप्त झाले आहे अशा भावना व्यक्त केल्या.निवड झालेल्या विद्यार्थ्यांवर केजशहरवासियांकडून अभिनंदाचा वर्षाव होत आहे.

## कोकणात ठाकरे गटाला पुन्हा धक्का; समीर शेडगे यांचा राजीनामा, राष्ट्रवादीत करणार प्रवेश



रायगड – गेल्या काही दिवसांपासून कोकणात शिवसेना ठाकरे गटाला सतत धक्के बसत आहेत. पक्षाचे नेते, कार्यकर्ते आणि पदाधिकारी ठाकरे गटाला सोडचिठ्ठी देत सत्ताधारी पक्षात सामील होत आहेत. अलीकडेच स्नेहल जगताप यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) मध्ये प्रवेश केल्यानंतर आता रोहा तालुकाप्रमुख समीर शेडगे यांनीही पक्षाला रामराम ठोकला आहे. ते लवकरच अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत दाखल होणार असून, येत्या १३ तारखेला राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत हा प्रवेश होणार आहे.

रायगडमध्ये ठाकरे गटाची ताकद कमी –

स्नेहल जगताप यांच्या पक्षांतरानंतर आता समीर शेडगे यांनीही ठाकरे गटाला सोडले, त्यामुळे रायगडमधील ठाकरे गटाची ताकद आणखी कमकुवत होताना दिसत आहे. शेडगे यांनी रोहा तालुकाप्रमुखपदाचा आणि शिवसेना सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. त्यांच्या या निर्णयाने ठाकरे गटाला कोकणात पुन्हा एकदा मोठा झटका बसला आहे.

स्नेहल जगताप यांचेही पक्षांतर –

यापूर्वी, महाड विधानसभेचे माजी आमदार माणिकराव जगताप यांच्या कन्या आणि माजी नगराध्यक्षा स्नेहल जगताप यांनीही ठाकरे गटाला जय महाराष्ट्र करत अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला होता. त्यांच्या पक्षांतराची चर्चा बराच काळ रायगड जिल्ह्यात सुरू होती. अखेर त्यांनी राष्ट्रवादीची वाट धरली आणि आता शेडगे यांच्या निर्णयाने ठाकरे गटाची पकड कोकणात आणखी ढिली होत असल्याचे चित्र आहे. दरम्यान, या घडामोडींमुळे ठाकरे गटाच्या कोकणातील राजकीय प्रभावाला मोठा धक्का बसत असून, सत्ताधारी महायुतीच्या पक्षांकडे नेत्यांचा ओघ वाढताना दिसत आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त १८ तास आभ्यास उपक्रम,२४९ विध्यार्थ्यांचा सहभाग, जिल्हाधिकाऱ्यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन,जेष्ठ महिलांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद.





लातूर – भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, विश्वारत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त लातूरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या वतीने विविध उपक्रम लातूर शहरात राबविण्यात येत आहेत, त्याचाच एक भाग म्हणून विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अनोख्या पद्धतीने अभिवादन करण्यासाठी सलग १८ तास अभ्यास हा उपक्रम गुरुवारी शहरातील सिद्धिर्थ बौद्ध विहार या ठिकाणी घेण्यात आला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या दैनंदिन जीवनात नेहमी १८ तासापेक्षा जास्त वेळ आभ्यास करून भारताची राज्यघटना लिहिली, त्या महामानवाला सलग १८ तास आभ्यास करून २४९ विध्यार्थ्यांनी अभिवादन केले आहे. दुपारच्या सत्रात जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे व भाजप नेते अजित पाटील कव्हेकर यांनीही या अनोख्या उपक्रमाला भेट देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी, सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे पदाधिकारी समता सैनिक दल, आदींसह परिसरातल्या जेष्ठ महिलांनी देखील या उपक्रमात उत्स्फूर्त पणे सहभाग नोंदवला आहे. या वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सुशील चिकटे सचिव राहुल कांबळे, बाबा कांबळे, आंबेडकरवादी मिशन स्पर्धा परीक्षा केंद्राचे संचालक दीपक कदम, प्रा. बापू गायकवाड. डीएस नर्सिंगे. भारतीय बौद्ध महासभेचे लातूर जिल्हाप्रमुख तथा अध्यक्षा आशाताई चिकटे महिला अध्यक्ष शारदाताई हजारे सरचिटणीस अभिमन्यू लामतुरे, विकास सर वंदनाताई कांबळे, उपाध्यक्ष रामदास साबळे,राजेंद्र क्षीरसागर, गौतम बनसोडे, मंगलताई सुरवसे कोषाध्यक्ष मायाताई कांबळे,सपना देडे, सुरेखा भालेराव सचिव प्रेमनाथ कांबळे,राजाभाऊ उबाळे, भाऊराव कांबळे रवींद्र राजेगावकर,आनंद ढोणेराव, देवराव जोगदंड, लक्ष्मण कांबळे,दत्तात्रय भोसले सैनिक छाया माने, शालू साबळे, सपना सूर्यवंशी, करुणा सूर्यवंशी, शीला जोगदंड आधी उपस्थित होते.

## देवगांवयेथील रेणूकादेवीयात्रेचे शनिवार पासुन आयोजन



केज/प्रतिनिधी केजतालुक्यातीलदेवगांवयेथील रेणुकादेवीयात्रेच दरवर्षी प्रमाणे यावर्षीही शनिवार दि.१२ एप्रिल पासुन आयोजन करण्यात आले आहे.देवीचा गाढा ओढणे,सोबत पालखी मिरवणुक कार्यक्रम व रविवारी संध्याकाळी (छबिना) पालखी मिरवणूकीने देवीच्या यात्रेची सांगता होणार असल्याने या यात्रा महोत्सवात मोठ्या संख्येंने सहभागी होऊन यात्रेची शोभा वाढवावी अशी विनंती रेणुका देवी संस्थानचे अध्यक्ष रमाकांत (बापू) मुंडे सह यात्रा कमेटीचे सदस्य आणि गावक-यांनी केली आहे.

केज तालुक्यातीलदेवगांव येथेगावच्या उत्तर दिशेला दोन कि.मी.अंतरावर तिर्थक्षेत्र रेणुका मातादेवीचे सुंदर मंदिर आहे. गावक-यांचेव पंचक्रोशितील गावांचे ग्रामदैवत असलेल्या या रेणुकादेवीची यात्रा दरवर्षीचैत्र महीन्यातील पौर्णीमेच्या दिवशी भरली जाते दर वर्षीप्रमाणे या वर्षीही दि.११ एप्रिल शुक्रवार रोजी गावातील सुहासिनीची पंगत देवी मंदीर परिसरत होणार आहे. दि.१२ एप्रिल २०२५ रोजी सकाळी हानुमान जयंती उत्सव साजरा करुन सकाळी आठ वाजतारेणुका देवीचा गाढा व सोबत देवीची पालखीदेवगांव येथून वाजत गाजत मंदीराकडे मार्गस्थ होणार आहे.हा पालखी सोहळा पाहण्यासाठी पंचक्रोशील मंडळी व महीलामोठ्या संख्येने सहभागी व्हावे.दुस-या दिवशी रविवारी दुपारी ४-०० वाजता रेणुका देवी मंदिर परिसरात महाप्रसादाची मोठी पंगत होणार व त्याच दिवशी संध्याकाळी गावातदेवीचा (छबिना) पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे.तरी या यात्रा महोत्सवात मोठ्या संख्येंने सहभागी होऊन यात्रेची शोभा वाढवावी अशी विनंती रेणुका देवी संस्थानचे अध्यक्ष रमाकांत (बापू) मुंडे सह यात्रा कमेटीचे सदस्य आणि गावक-यांनी केली आहे.

## लातूर धाराशिवसह मराठवाड्यातील अमली पदार्थांचे कनेक्शन चिंताजनक - माजी मंत्री आमदार अमित देशमुख



लातूर / प्रतिनिधी :- प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत, विकासाची कास धरलेल्या, लातूर धाराशिवसह मराठवाड्यात नव्याने उघड झालेले अमली पदार्थाचे कनेक्शन ही अत्यंत चिंतेची बाब असल्याचे स्पष्ट करून पोलीस यंत्रणेने विशेष मोहीम राबवून या व्यवसायाची पाळे-मुळे उखडून टाकावीत अशी मागणी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी या संदर्भाने म्हटले आहे की, शिक्षण, उद्योग, व्यापार, कृषी, सहकार आणि आरोग्य सेवेचे केंद्र म्हणून नावारूपाला येत असलेल्या लातूर जिल्ह्यातील काही लोक अमली पदार्थ निर्मिती तसेच विक्रीच्या प्रक्रियेत गुंतल्याची धक्कादायक बाब नुकतीच उघडकीस आली आहे. या प्रकाराने मन सुन्न झाले असून, राज्यातील पोलीस यंत्रणा नेमके काय करीत आहे? हा प्रश्न आता निर्माण झाला आहे, अत्यंत प्रतिकूल नैसर्गिक परिस्थितीतही, जिद्द, चिकाटी आणि परिश्रमाच्या जोरावर मराठवाड्यातील जनता प्रगतीच्या वाटा शोधण्याचा प्रयत्न करीत असताना अलीकडच्या काळात, छत्रपती संभाजीनगर, बीड, धाराशिव, लातूर या जिल्ह्यात चुकीच्या प्रवृत्तीचा प्रवेश होऊन अवैध व्यवसाय वाढू लागले आहेत. मुंबई, पुणे, नाशिक, सांगली, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर येथे अमली पदार्थांच्या व्यवसायाचे कनेक्शन उघड झाल्यानंतर, त्याचे लोण आता बीड, धाराशिव, लातूरपर्यंत येऊन पोहोचले आहे. सध्या तुळजापूरचे अमली पदार्थ संदर्भातील प्रकरण गाजत असतानाच आता लातूर जिल्ह्यातील चाकूर तालुक्यात अतिदुर्गम भागात रोहिणा येथे एमडी ड्रग्स निर्मितीचा अवैध उद्योग सुरू असल्याचे उघड झाले आहे. सर्वात गंभीर बाब म्हणजे ठाणे जिल्ह्यात पोलीस म्हणून कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्याने आपल्या गावात ड्रग्स निर्मितीचा व्यवसाय उभारल्याचे समोर आले आहे. अमली पदार्थाच्या महाभयंकर व्यवसायाचा तुळजापूरसारखे तीर्थक्षेत्र आणि लातूरसारख्या शैक्षणिक केंद्राशी संपर्क येणे ही अत्यंत चिंतेची बाब असल्याचे माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी म्हटले आहे. महाराष्ट्र शासन आणि गृह विभागाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन विशेष मोहिमेद्वारे अशा अवैध व्यवसायाची पाळेमुळे उखडून टाकणे आवश्यक बनले असल्याचे त्यांनी म्हंटले आहे. अमली पदार्थाचा हा व्यवसाय कोण करते आहे याचा शोध घ्यावा, त्यांच्या पाठीशी कोण लोक आहेत याचाही छडा लावावा आणि या सर्वावर कडक स्वरूपाची कार्यवाही करावी असेही त्यांनी म्हटले आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE